म. ग्रं. सं. ठाणे
विषय — चरित्र
सं. क्र. १३०९



REFBK-0014437

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ४०५३१ कि. ५।१२।७
विषय ... कों कि. २९।५।६८

भारताचे रणझुंजार माला : पुष्प ५ वे

१४४३७

# यशवंतराव होळकर

# तात्या टोपे

REFBK-0014437

लेखिका
सौ. प्रतिभा प्रभाकर चितळे
बी. ए. (ऑनर्स)

प्रथमावृत्ति १९६५

मूल्य रु. १·२५

© विदर्भ मराठवाडा बुक कंपनी

मुद्रक :

**वि. ग. माटे**

विश्वकर्मा मुद्रणालय, (प्रा.) लि.

४०५ नारायण पेठ पुणे २.

प्रकाशक :

**अ. ज. प्रभु**

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी

१३२० शुक्रवार पेठ, पुणे २.

प्रणाम

जयीं उजळिल्या जीवांच्या ज्योति,
अन् तेजाळलें स्वदेश-मंदिर.
जीवित अपुलें मानुनि तृणवत्
मिळविली जयांनीं थोर दिगंता कीर्ति—
त्या नरवीरां रणझुंजारां
असोत अमुचे लाख प्रणाम

## यशवंतराव होळकर


१ अंधार अंधार
२ अंधारांतील एक तेजस्वी शलाका
३ डिवचलेला नागराज
४ शिंद्याला नमविलें
५ आतां पेशवा
६ इंग्रजांशीं दोन हात
७ सारी भिस्त घोड्याच्या खोगिरावर
८ इंग्रजांची पवित्र भूमिका
९ युद्धाला तोंड लागलें
१० मुकुंदऱ्याची खिंड गरजली
११ मथुरा कृष्णाची
१२ दिल्ली मात्र दूरच राहिली
१३ पराक्रमाचा कळस
१४ पण शेवटीं


## तात्या टोपे


१ सत्तावनचा झुंजार
२ बोरू टाकला, तलवार घेतली
३ पुन्हां कानपूर जिंकलें—आणि घालविलें
४ भरारी गरुडाची, पण—
५ मरेपर्यंत झुंज
६ तात्या अमर झाले

# प्रकाशकाचे दोन शब्द

आपल्या भारताची परंपरा थोर, संस्कृतीही थोर. हा देश ऋषिमुनींचा, तसाच थोर सम्राटांचा. शूरांनीं याची शान वाढविली; विद्वानांनीं याची मान उंचावली. कारागिरांनीं याला वैभवसंपन्न केलें; कष्टकऱ्यांनीं याच्या मातीचें सोनें केलें.

असा आहे आपल्या भारताचा थोर इतिहास. अशोक–समुद्रगुप्तांनीं त्याचीं पानें रंगविलीं आहेत. प्रताप–शिवाजींनीं त्याला सोनेरी किनार चढविली आहे. लाल–बाल–पाल या त्रिमूर्तींच्या त्रिगुणात्मक कर्तृत्वाच्या फुलोऱ्यानें तो फुलला आहे; आणि गांधी–सुभाषांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वानें तो तेजाळला आहे.

आम्हीही त्यांच्या प्रयत्नांत सहभागी होऊं इच्छितों. आमचें लक्ष्य संस्कार. आमची दृष्टि भावी पिढीवर खिळलेली. आम्हांला आमची भावी पिढी सर्व दृष्टींनीं सुदृढ व्हावीशी वाटते. ती ज्ञानी व्हावी तशी बलवानही व्हावी. ती बुद्धिवादी व्हावी तशी झुंजारही व्हावी. ती यत्नवादी व्हावी तशी श्रमवादीही व्हावी.

तरी पण आज आम्हांला हवे आहेत रणझुंजार. केवळ पोषाखी नकोत. वृत्तीचे हवेत. त्यासाठीं आमचा हा उपक्रम. आमचे हे रणझुंजार अखिल भारताचे प्रतिनिधि आहेत. ते कोणा एका विशिष्ट जातीचे वा पंथाचे नाहींत. त्यांचा परिचय करून घ्या व त्यांची झुंजार वृत्ति आपल्या अंगीं बाणवा.

आमचे बाल आणि तरुण वाचक या रणझुंजारांचें सहर्ष स्वागत करतील अशी आम्ही आशा बाळगतों.

आमच्या या उपक्रमाला अनेक मित्रांनीं साहाय्य केलें आहे. त्यांतही विशेष आपुलकीनें साहाय्य करणारे पुण्यांतील प्रथितयश इतिहास-संशोधक व शिव-शाहीर श्रीमान् बाबासाहेब पुरंदरे यांचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. त्याबद्दल त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत. तसेंच ही माला गुंफण्याच्या कामीं ज्या ज्या मित्रांचें आम्हांस वा लेखकांस साहाय्य झालें त्या त्या सर्वांचें ऋण व्यक्त करून आम्ही आमचें हें निवेदन पुरें करितों.

— प्रकाशक

# निवेदन

'रणझुंजारां'चें व्यक्तिदर्शन घडविण्याची मूळ कल्पना माझे वडील श्री. व. द. ताम्बे यांची. इतिहास हा त्यांचा आवडता विषय. त्यांचा 'पिंड शिक्षकाचा. हा विषय मुलांना आवडेल अशा पद्धतीनें मांडण्याची त्यांची विलक्षण हातोटी. त्यामुळेंच 'रणझुंजारां' ची ही एक मालिका मुलांसाठीं तयार करण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यांचीं टिपणेंही लगोलग तयार झालीं. पण सरकारी नोकरींतील बंधनांमुळें आणि विविध जबाबदाऱ्यांमुळें त्यांच्या हातून ही मालिका पूर्णपणें गुंफली जाणें अशक्य झालें.

मालिकेची ही चांगली कल्पना केवळ पूर्वतयारीवरच थांबावी ही गोष्ट आम्हां मुलींना खटकली. मी व माझी धाकटी बहीण सौ. शशिकला ओक आम्ही दोघींनींच निर्णय घेतला आणि वडिलांचें हें आवडतें कार्य हातीं घेतलें. एका अर्थी आमचें हें धाडसच होतें. पण वडिलांचें समर्थ पाठबळ असल्या-मुळें आम्ही धैर्यानें पाऊल टाकलें.

आम्हीं दोघी भाषेच्या विद्यार्थिनी. भाषेवर आमचें प्रभुत्व नसलें तरी लेखनाची आवड दोघींनाही आहे. आणि कांहीं झालें तरी वडिलांचा वारसा आम्ही मुली घेणारच! त्यांत हें कथावाङ्मय. चिंतनाचा आणि पांडित्याचा येथें काय उपयोग? गोष्ट कशीही असो. मुलांना ती आवडतेच. पराक्रमी वीरांच्या गोष्टी तर त्यांना फारच आवडतात. तेव्हां आमचा हा प्रयत्न मुलांना तरी खचितच रुचेल. तरीपण तिखट तलवारींचे घाव धारदार शब्दांनींच वेंचले पाहिजेत. निर्जीव शब्दांनीं ते बोथट नाहीं का ठरायचे? रणझुंजारांच्या झुंजार कृति जिवंत शब्दांतच रेखाटण्याचा आमचा प्रयत्न आहे. तो कितपत सफल झाला आहे तें वाचक ठरवतीलच.

आमचे प्रकाशक मित्र श्री. प्रभु यांचीच सारी प्रेरणा व धडपड. त्यांना धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच!

—लेखिका

# यशवंतराव होळकर



यशवंत झुंजार

"कांहींतरी एखादी उच्च भावना देशामध्यें उत्पन्न झालेली असली पाहिजे. म्हणजे तिच्याभोंवतीं सर्व लोक सहजच एकत्र गोळा होतात. आणि या भावनेच्या प्रेरणेनें एकदां डोक्यांत पेट घेतला, म्हणजे हातांत शौर्य येणें हा त्याचा स्वाभाविकच परिणाम होतो. एखादें उच्च ध्येय अंतःकरणामध्यें प्रदीप्त झालें, म्हणजे त्याच्या योगानें लहान मुलेंही पराक्रमी होतात आणि स्त्रियांनाही वीरश्री चढते. उच्च भावनांना पराजय हा शब्द माहीतच नाहीं. जीं पावलें उच्च ध्येयाच्या मार्गावर पडूं लागलीं, त्यांना कोणता शत्रु मागें हटवूं शकणार आहे ?"

—शि. म. परांजपे

## १ अंधार अंधार

मराठी साम्राज्याचा भाग्यरवि मावळतीच्या मायापाशांत पुरता गुरफटला. तिची ती लाललाल उधळण फसवी होती हें त्याच्या लक्षांत आलें नाहीं. त्या मोहक भुलावणीला तो भुलला आणि बुडाला. अगदीं साफ साफ बुडाला !

इंग्रजांनीं तैनाती फौजेचा मायापाश पेशव्यांच्या गळ्याभोंवतीं टाकला. पेशव्याला समजलें नाहीं कीं हा पाश आपला नाश करील आणि त्याबरोबरच आपलें हें महान् साम्राज्यही नष्ट होईल. वसईच्या तहानें दुसऱ्या बाजीरावानें पेशवाईचें उदक इंग्रजांच्या

हातावर सोडलें. पेशवे इंग्रजांच्या हातांतील बाहुलें बनले. पेशवाईची इतिश्री झाली.

पेशवा हा मराठशाहीचा मुख्य आधारस्तंभ. छत्रपति हे केवळ नामधारी स्वामी. खरी सत्ता पेशव्यांच्या हातीं. आपल्या मराठा-मंडळाच्या मदतीनें तो सर्व कारभार पाही. मराठामंडळांत शिंदे, होळकर, भोंसले, गायकवाड वगैरे सर्व मातबर सरदार होते. त्यांचें नेतृत्व पेशव्यांकडे होतें. त्यामुळें हें मराठामंडळ म्हणजे राज्याचें सुरक्षामंडळच होतें. बाजीरावानें हें मंडळ तयार केलें. इतकेंच नव्हे तर त्याला राज्यविस्ताराचें नवें विशाल क्षेत्र दाखवून त्याच्या-कडून फार मोठी कामगिरी करून घेतली. दिल्लीचे दरवाजे ठोठावले ते याच मराठामंडळानें. निजाम-हैदरांना वांकविलें तें याच मराठा-मंडळानें आणि पानिपतावर झालेली अपरिमित हानि भरून काढून साऱ्या हिंदुस्थानची मसलत केली तीही याच मराठामंडळानें. मराठशाहीचें सारें कर्तृत्व या मराठामंडळांत होतें. तें जोंपर्यंत एकवटलेलें होतें तोंपर्यंत मराठशाहीचें वैभव सूर्याच्या तेजासारखें तळपत होतें.

माधवरावाच्या अकाली मृत्यूमुळें या कर्तृत्वाला तडा गेला. तें दुभंगलें, नव्हे, त्याचे तुकडे तुकडे झाले एक एक सरदार हा त्या कर्तृत्वाचा अलग तुकडा झाला. प्रत्येक सरदार स्वतःपुरता पराक्रमी व कर्तबगार होता. पण मराठामंडळाच्या एकजिनसी कर्तृत्वाच्या दृष्टीनें त्याचा पराक्रम आणि त्याची सारी कर्तबगारी कुचकामी ठरली.

या सर्व अनर्थांचें कारण एकच. तें म्हणजे नेतृत्व दुबळें झालें हें होय. छत्रपति स्वत: बलवान होते तोंपर्यंत राज्य भक्कम होतें. ते दुबळे झाले तरी जोंपर्यंत पेशव्यांचे हात बळकट होते तोंपर्यंत राज्याला कशाचीही भीति नव्हती. पण पेशव्यानें स्वत: होऊन आपले हात इंग्रजांच्या हातांत दिल्यावर राज्य कसें टिकणार? आधारच कोलमडल्यावर इमारत कशी उभी राहूं शकेल? ती जमीनदोस्तच होणार. मराठ्यांच्या साम्राज्याची इमारत अशीच कोसळली.

काळ पार बदलला. शिवशाहीच्या काळांत मराठे वीर आपलें शौर्य स्वातंत्र्याच्या पायींच समर्पण करीत. त्यांचेच वंशज आतां आपलें शौर्य परक्यांना विकूं लागले. जो भाकरी देईल त्याची चाकरी करायची ही क्षुद्र वृत्ति लोकांत बाणूं लागली. इंग्रजांसारख्या परक्यांची नोकरी करण्यांत लोक आनंद मानूं लागले. इतकेंच नव्हे तर इंग्रजांनीं फेकलेल्या तुकड्याच्या मोहामुळें ते स्वत:च्या देशाच्या स्वातंत्र्याविरुद्ध लढण्यालाही तयार होऊं लागले. स्वातंत्र्याचें प्रेम संपलें स्वराज्याची निष्ठा नष्ट झाली. राहिला फक्त स्वार्थ. त्याच्या-पायीं कसलेंही पातक करण्यास ते डगमगले नाहींत.

असे पातकी लोक कोण कोण होते म्हणून सांगूं? कुणा-कुणाचीं नांवें लिहून झरणी विटाळूं? केवळ स्वार्थासाठीं स्वदेशाशीं बेइमान होणाऱ्या नरपुंगवांची जंत्री देण्यासाठीं ही लेखणी उचलली आहे का? नाहीं, त्रिवार नाहीं. त्यासाठीं ही लेखणी उचलली नाहीं तरीपण त्यांच्या या स्वदेशद्रोही करणीनें भारतमातेची

मूळची तेजस्वी मुद्रा काळवंडली ही गोष्ट सांगितलीच पाहिजे. कशामुळें झालें हें ? आमचे पराक्रमी सरदार कुणाच्या राजकारणानें फसले ? कुणाच्या गळाला हे मासे लागले ?

मोठी दुःखद कथा आहे ती. इंग्रज नांवाचे लोक साता-समुद्रांपलीकडून या देशांत आले. प्रामाणिकपणें व्यापार करण्या-साठींच ते आले; त्यांनीं व्यापाराच्या वखारी घातल्या आणि ते खराखुरा व्यापार करूं लागले. पण ते मोठे हुषार व्यापारी होते. त्यांच्या हातांत व्यापाराचा तराजू होता. पण त्यांच्या डोक्यांत राजकारण शिजत होतें. हळूहळू त्यांचें राजकारण रंगूं लागलें. भारताच्या नकाशाचा रंग बदलूं लागला. तराजू गेला, तलवार आली. भारताचे लचके तुटूं लागले. त्यावर लाल रंगाचा साज चढला.

एवढें होत असतांना आमचे पराक्रमी सरदार काय करीत होते ? ते काय झोंपा काढीत होते ? होय, एका अर्थानें ते झोपलेच होते. त्यांच्या डोळ्यांवर स्वार्थाची झांपड आली होती. स्वार्थ साधण्यासाठीं ते भावाचा गळा कापण्यासाठीं सरसावलेले होते. त्यांच्या तिखट तलवारी स्वजनांच्या छातींत घुसत होत्या. त्यांना देश दिसत नव्हता. धर्म कळत नव्हता. कर्तव्याची जाण होत नव्हती. स्वहिताची चाड उरली नव्हती. त्यामुळें इंग्रजांचें चांगलेंच फावत होतें. त्यांनीं एक एक डाव टाकावा आणि आमचे पराक्रमी सरदार त्याला बळी पडावे असें घडूं लागलें.

क्लाइव्ह आला. त्यानें फितुरीचें जाळें टाकलें. त्यांत बंगाल

हातीं आला. वॉरन् हेस्टिंग्ज आला. त्यानें दमदाटी करून अफाट पैसा उकळला. वेलस्ली आला. त्यानें तैनाती फौजेचा मायावी पाश टाकला. त्यांत अनेक लहान मोठे सत्ताधीश सहजपणें अडकले. इंग्रजांचा हाच डाव सर्वांत अधिक प्रभावी ठरला. आमचे शिंदे याच डावाला बळी पडले. आमचे नागपूरकर भोंसले याच पाशांत कायमचे लटकले. आमचे गायकवाड याच कारवाईला फसले आणि आमचे पेशवेही याच फासानें आवळले गेले. परिणाम काय झाला ?

पेशवे इंग्रजांचे गुलाम झाले. त्यांचे सरदार इंग्रजांचे गुलाम झाले. मराठ्यांचें साम्राज्य मोडलें. शिवशाहीची भव्य मूर्ति खालीं कोसळली. मराठ्यांच्या भाग्याचा रवि मावळला आणि सर्वत्र अंधारच अंधार पसरला.

## २ अंधारांतील एक तेजस्वी शलाका

अशाही अंधारांत एक तेजस्वी तारा चमकून गेला. कसल्याही पाशांत तो अडकला नाहीं. कसल्याही भुलावणीनें तो भुलला नाहीं. इंग्रजांच्या राजकारणी कारवायांना तो बळी पडला नाहीं. स्वजनांच्या नादान करणीनें तो खचला नाहीं. ध्रुवताऱ्यासारखा तो अढळ राहिला.

शिवरायासारखा त्याचा दिव्य पराक्रम. बाजीरावासारखी त्याची नेत्रदीपक दौड. गरुडासारखी त्याची वेगवान भरारी.

त्याची तडफ विलक्षण. त्याची जिद्द दुर्दमनीय. अगदीं पडत्या काळांत त्यानें गाजविलेली मर्दुमकी बिनतोड होती. इंग्रजांच्या बेबंद चढाईला कांहीं काळ तरी पायबंद घालण्याची फार मोठी किमया या वीरानें केली. भोंवतालीं स्वार्थ ओसंडत होता. लोचटपणा शिगेला पोहोंचला होता. दुबळेपणा बळावला होता. लाचारी वाढली होती. या सर्व लांछनास्पद पार्श्वभूमीवर या वीराचें साहसी जीवन विशेष तळपून दिसतें.

या आमच्या पराक्रमी नायकाचें नांव यशवंतराव होळकर. रियासतकार सरदेसाई म्हणतात, "यशवंतरावांचें एकंदर चरित्र साहसानें इतकें भरलें आहे कीं त्यास एक प्रकारची कादंबरीच म्हणतां येईल."

यशवंतराव म्हणजे मूर्तिमंत पराक्रम. यशवंतराव म्हणजे झुंजार साहस. मराठशाही अंधाराच्या खोल दरींत कोसळत असतांना ही तेजस्वी शलाका चमकली. तिची चमक इतिहासाच्या पानोपानीं उमटली आहे, तशीच ती भारतीयांच्या हृत्पटलावर सतत झळाळत राहिली आहे.

अशा या वीराचें नांव समजलें. पण त्याचें घराणें कोणतें? कोणत्या थोर कुळाचें नांव त्यानें धारण केलें होतें? कोणत्या प्रदेशाची सरदारकी त्यानें गाजविली होती?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम........................ वि: ......................
क्रमांक ........................ नों दि ...............

यशवंतरावाचें आडनांव होळकर. होळकरांच्या नामवंत घराण्यांत यशवंतराव जन्मला व वाढला.

## ३ डिवचलेला नागराज

तुकोजीला यशवंतराव धरून एकूण चार मुलगे. सर्वांत मोठा काशीराव. हा पंगु, निर्बुद्ध आणि सर्वथा परावलंबी वृत्तीचा होता. तो नेहमीं दौलतराव शिंद्याच्या कच्छपीं असे दुसरा मुलगा मल्हारराव हा मात्र धाडसी व कर्तृत्ववान् होता. नाना फडणिसाच्या विश्वासांतला म्हणून पेशव्यांचा आणि शिंद्यांचा त्याच्यावर भारी राग. नानाचें व दुसऱ्या बाजीरावाचें कधींच सूत जमलें नाहीं. बाजीराव नेहमीं शिंद्याच्याच तंत्रानें वागे. त्यामुळें नानाचे लोक हे त्याला शत्रूसारखे वाटत. दौलतराव शिंदे हा सुद्धां नानाचा द्वेष करी.

बाजीराव व दौलतराव यांची ही युति पेशवाईला अगदीं अशुभ ठरली. बाजीराव स्वतः तर नालायकच होता. शिवाय त्यानें भोवतीं जमविलेली फटावळ हीही नालायक आणि स्वार्थानें बरबटलेल्या नादान लोकांची. बाळोबा कुंजर नांवाचा एक गुंड पेशव्याचा जिगर दोस्त—त्याचा उजवा हात. दौलतराव शिंदे हा त्याचा डावा हात तिघेही सारखेच चैनी, दुबळे आणि बेजबाबदार. राज्य चालविण्याची कुवत एकांतही नव्हती. आव मात्र आणीत होते चाणक्याच्या मुत्सद्देगिरीचा.

शिंद्याची जहागीर माळव्यांत होती. जहागीर मोठी होती. रणधुरंधर बापजाद्यांची कमाई होती ती. राणोजी, जनकोजी,

महादजी यांसारख्या एकाहून एक वरचढ अशा मातबर सरदारांनीं आपल्या अखंड कर्तृत्वाचें खतपाणी घालून ती वाढविली होती. पण आतां ती दौलतरावासारख्या कमअस्सल वंशजाच्या हातीं आल्याबरोबर तिला अवकळा आली. स्वतःची जहागीर सांभाळण्याची अक्कल तर दौलतरावाजवळ नव्हतीच. तरीपण होळकराची जहागीर घशांत घालण्याचे मनसुबे मात्र तो रचीत होता. त्यासाठींच तर त्याचा मुक्काम पुण्यांत असे. पेशव्याच्या कानाला लागून तो हा लाभ उठवूं पाहात होता.

तुकोजी मरण पावल्यावर त्याचा मोठा मुलगा काशिराव गादीवर आला. तो पंगू आणि निर्बुद्ध असल्यामुळें धाकट्या मल्हाररावाला गादी मिळणें अधिक योग्य ठरलें असतें. पण शिंद्याला तें नको होतें. मल्हारराव गादीवर येता तर शिंद्याचा कावा सफल झाला नसता. म्हणून शिंद्यानें काशीरावालाच हातीं धरलें आणि पेशव्याला सांगून त्याची नेमणूक कायम केली. इतकेंच करून तो थांबला नाहीं. त्यानें संधि साधून मल्हाररावांचा कपटानें खून केला (इ. स. १७९७). अशारीतीनें त्याच्या मार्गातील कांटा त्यानें अत्यंत नीचपणानें वागून दूर केला.

पण हेंच पाप शेवटीं त्याच्या मानगुटीला बसलें. त्याचा मार्ग मोकळा होण्याऐवजीं तो अधिकच अवघड होऊन बसला. तुकोजीचे दोघे पुत्र विठोजी आणि यशवंतराव मल्हाररावाचे पक्षपाती होते. होळकरांची गादी मल्हाररावांकडे यावी असें या दोघांनाही वाटत होतें. परंतु शिंद्यानें मल्हाररावांचा कपटानें खून केल्याचें

पाहातांच दोघेही वाघासारखे पिसाळले आणि त्यांनीं शिंद्याच्या प्रदेशांत धुमाकूळ घातला. आधींच शिंदे-होळकरांचें पिढीजात हाडवैर होतें. तें या घटनेनें आणखी चिघळलें.

मल्हाररावांचा कांटा काढून टाकला कीं होळकरांची जहागीर आपल्या हातांत येईल ही दौलतरावाची कल्पना होती. पण ती फोल ठरली. विठोजी व यशवंतराव यांनीं मल्हाररावांचा मुलगा खंडेराव याच्या नांवानें द्वाही फिरविली आणि त्याला गादीवर बसविण्याचा चंग बांधला. हा सर्व खटाटोप यशवंतरावानें सुरू केला आणि विठोजीनें त्याला साथ दिली. यशवंतराव वयानें सर्वांत लहान पण अकलेनें सर्वांत मोठा. शिंद्याला तो पूर्ण ओळखून होता. शिंद्यानें डाव टाकावा आणि यशवंतरावानें तो साफ उधळून लावावा असें अनेकदां झालें.

या दोन होळकरबंधूंचा निकाल लावल्याखेरीज आपला बेत तडीस जाणें अशक्य आहे हें शिंद्याला कळून चुकलें. पण हें कसें साधावें ? यशवंतरावाचें बळ तर दिवसेंदिवस वाढतच होतें. अनेक जुने जुने सरदार त्याला सामील झाले होते. गनिमी युद्धाच्या कलेंत निष्णात असलेले अनेक भिल्ल त्याला येऊन मिळाले होते. त्यानें तयार केलेलें घोडदळाचें पथक शिंद्याच्या सेनेला हैराण करीत होतें.

आणि याहूनही बळावत होती यशवंतरावाची जिद्द. त्यानेंही शिंद्यावर मात करण्याचा विडाच उचलला होता. वास्तविक त्यानें शिंद्याशीं वैर धरायला नको होतें. त्यानें तें धरलेंही नसतें. पण

शिंद्यानें होळकराच्या प्राणावरच घाव घातला होता. त्याच्या जहागिरीवर शिंद्याची पापी नजर खिळून राहिली होती. मग होळकरानें काय करावें ? जहागिरीची आशा न धरतां शिंद्याला शरण जावें ? यांत कोणता पुरुषार्थ होता ? आपसांत वैरभाव नको असें होळकरालाही वाटत होतें. तो नाहींसा व्हावा यासाठीं यशवंतरावानें तडजोडीचे थोडे प्रयत्न केले नाहींत. पेशव्याला तर त्यानें अनेकदां पत्रें लिहिलीं. न्याय्य तडजोडीसाठीं त्याच्या विनवण्याही केल्या. पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. पेशवे किंवा शिंदे कोणीही यशवंतरावाशीं समेट करण्यास तयार झाले नाहींत.

यशवंतरावापुढें दुसरा मार्गच उरला नाहीं. न्यायासाठीं या दोघांशींही लढणें त्याला भाग होतें. त्यानें लढ्याची तयारी चालविली. त्याचा हा लढा स्वकीयांशीं होता. पण तो धर्मासाठीं होता. सत्यासाठीं होता. यशवंतराव जसा रणशूर होता तसा धर्मनिष्ठहि होता. प्रत्यक्ष लढाई करण्यापूर्वी तो जेजुरीला गेला. जेजुरीचा खंडोबा हा त्याचा कुलस्वामी. त्यानें खंडोबाची पूजा केली, गुरवाकडून प्रसाद घेतला, आणि सैन्याची जमवाजमव करीत तो नागपूरला रघूजी भोंसल्याकडे गेला. भोंसले त्याला मदत करण्यास प्रथम तयार होता. इतक्यांत पेशव्यांचें धमकीचें पत्र आलें आणि त्याचें धोरण बदललें. त्यानें यशवंतरावाला पकडून कैदेंत टाकलें.

यशवंतरावाला पिंजऱ्यांत अडकून राहणें पसंत नव्हतें. त्याला बाहेर फार मोठें कार्य करून दाखवावयाचें होतें. तें कार्य खरें त्याच्यासाठीं खोळंबून राहिलें होतें. इच्छा बळावत होती. पण काळ आडवा येत होता. क्षुद्र अडचणी त्याचा मार्ग नाहक रोखीत होत्या. पण यशवंतरावाचें दिल त्याला कोंडून ठेवणाऱ्या त्या किल्ल्याहून कितीतरी पटीनें भक्कम होतें. दिल ताठ झालें आणि किल्ल्याहून खोलीच्या खिडकीचे भक्कम गज वाकले. यशवंतराव निसटला.

तो गुरगांवला गेला. तेथें त्याच्या गुरूचें–चिमणभाऊचें–त्याला दर्शन घडलें. त्यानें त्यांचा आशीर्वाद घेतला. त्याचा आत्मविश्वास वाढला. गुरूंनीं नुसता आशीर्वादच दिला नाहीं तर आपला धाडसी सेवक लाला भवानीशंकर यासही त्याच्या मदतीला पाठविलें. हा भवानीशंकर यशवंतरावाचा सेनापति झाला. यशवंतरावानें इंग्रजांशीं जे यशस्वी सामने दिले ते लाला भवानीशंकरासारख्याच तडफदार सेनानायकाच्या आधारावर! अशा सेनानायकांची यशवंतरावाला कधींच वाण पडली नाहीं.

यशवंतरावाचें प्राबल्य वाढूं लागलें. काशीराव स्वतः होऊन यशवंतरावाकडे आला. दोघा भावांचा समेटही झाला. परंतु इकडे शिंद्याचा मात्र जळफळाट झाला. त्याचें सारें कारस्थानच फसलें कीं! त्याच्या राजकारणाचा पायाच ढासळला. आतां काय करावें?

पण कुटिल कारस्थानें करणाऱ्यांना हजार वाटा असतात. काशीराव यशवंतरावाला सामील झाल्याबरोबर दौलतरावानें पेशव्याच्या कानाशीं लागून त्याची जहागीर जप्त करण्याचा घाट घातला. हें कळतांच होळकरबंधु भयंकर संतापले. त्यांनीं शिंद्याच्या आणि पेशव्याच्या प्रदेशांत धुमाकूळ घातला. त्यांचीं गावेंच्या गावें उध्वस्त केलीं. मुलूख बेचिराख केला. विठोजीची मुसंडी तर विलक्षण होती. त्याला आवरायला हवें होतें.

पण आवर कोण कुणाला घालणार ? वास्तविक ही जबाबदारी पेशव्याची होती. शिंदे व होळकर हे पेशव्याचे सरदार होते. त्यांच्यामधलें हें भांडण पेशव्यानें वेळींच मिटवायला हवें होतें. नाना — महादजी मधलें भांडण सवाई माधवरावानें नाहीं का कौशल्यानें मिटविलें ? सवाई माधवराव तर वयानें किती लहान होता ! पण शहाणपण वयावर अवलंबून नसतें हेंच खरें. बाजीराव पेशव्याला हें भांडण मिटवितां तर आलें नाहींच. उलट स्वार्थलंपट दौलतरावाच्या आहारीं जाऊन त्यानें तें विकोपाला नेलें.

शिंदे होळकराचा सर्वथैव नाश करावयास टपलेला. त्याच्या दुष्टपणाला कमालीची धार आलेली. तरीही पेशव्यानें त्यालाच साथ द्यावी हा केवळ दैवदुर्विलासच होय. शिंदे बोले आणि पेशवा चाले अशीच रीत झाली होती.

याच चालीनें चालून पेशव्यानें आणखी एक भयंकर चूक केली. त्याच्या प्रदेशांत जाळपोळ करणाऱ्या विठोजीचा बंदोबस्त

करण्यासाठीं त्यानें बापू गोखल्याला पाठविलें. येथपर्यंत ठीकच होतें. पण एवढेंच करून तो थांबला नाहीं. बापू गोखले यानें विठोजीला पकडून पुण्याला आणलें होतें. पेशव्यानें शिंद्याच्या सांगण्यावरून त्याला हत्तीच्या पायाशीं बांधून ठार मारिलें. " सरकारवाड्यांत पोंचतांच बेडी तोडून मार मार मारिला. दोनशें कमचा मारून लागलीच हत्तीच्या पायास बांधून वोढविला." असें बखरींतील वर्णन आहे. हा प्रकार शनिवारवाड्याच्या पुढील चौकांत घडला. शिक्षेचा अंमल होत असतां बाजीराव पेशवा, बाळोबा कुंजर वगैरे बडी मंडळी वरच्या दिवाणखान्याच्या खिडकींत बसून ही मजा पाहात होती. रक्ताच्या थारोळ्यांत लडबडणारें आणि धुळीनें माखलेलें तें विठोजीचें प्रेत पाहून त्यांच्या डोळ्यांचें पारणें फिटलें असावें. आपल्या या दिव्य पराक्रमाचें प्रदर्शन करण्यासाठीं पेशव्यानें तें प्रेत चोवीस तास चौकांत टांगून ठेवविलें.

भावावर झालेल्या या अमानुष अत्याचारानें यशवंतरावाच्या अंगाची लाही लाही झाली. त्याचें पित्त भडकलें. या अत्याचाराचा पुरेपूर सूड घेण्याचा त्यानें निश्चय केला. डिंवचलेला नागराज दंश केल्याशिवाय कसा राहील !

१०८३८

यशवंतरावानें लढाईची जय्यत तयारी केली. त्याचा खरा राग पेशव्यापेक्षां शिंद्यावर अधिक होता. शिंदे त्याचा हाडवैरी. शिंद्यांच्या नादीं लागल्यामुळें पेशवा बिघडला असें त्याचें मत होतें. शिंद्यांचा नायनाट केला कीं पेशवा आपोआप सरळ येईल असें त्याला वाटत होतें. अर्थात् शिंद्याबरोबर लढत असतांना पेशवा मध्यें आला तर — तर काय, इंद्र आणि तक्षक या दोघांचाही स्वाहा करणें त्याला भाग पडणार होतें. त्यालाहि तो तयार होता.

## ४ शिंद्याला नमविलें

तरीपण प्रथम तो शिंद्याकडे वळला, शिंद्याच्या प्रदेशावर चालून जाण्यासाठीं त्याच्या फौजा सिद्ध झाल्या. शिंद्यानेंही आपली फौज जमविली. या वेळीं शिंद्याचें बळ फार कमी झालें होतें. इंग्रजांनीं त्याचा पराभव करून त्याला पांगळा करून टाकलें होतें. त्याचे जुने अनुभवी सरदार त्याला केव्हांच सोडून गेले होते. त्याची सारी भिस्त तोफा आणि कवायती पलटणी यांवर होती, पण त्याही आतां पिचल्या होत्या. महादजी शिंद्यांच्या वेळचा दरारा कधींच संपला होता. 'काप गेले भोकें उरलीं' अशांतला प्रकार झाला होता. तोफा असून काय उपयोग होता? त्या डागणारे हात कोठें होते? आणि हात आले तरी त्यांना चालना देणारें कणखर आणि लढाऊ मन कोठें होतें? शिंद्यापाशीं ससज्ज फौज होती पण ती निर्जीव झाली होती. तिच्यांत जिद्द नव्हती, हिंमत नव्हती. झुंजारवृत्तीचा तर पूर्ण अभाव होता. पण याहूनही

अधिक महत्त्वाची गोष्ट ही की ती फौज शिंद्यांची राहिली नव्हती. ती इंग्रजांच्या ताटाखालचें मांजर होऊन राहिलेल्या एका शेळपट सरदाराची फौज होती. ती पराक्रम काय गाजविणार ?

तरीपण ती रणांगणावर उतरली. नव्हे, तिला रणांगणांत उतरावें लागलें. शिंद्याची इच्छा असो वा नसो. तिला दुसऱ्या कुणाच्या तरी इच्छेमुळें रणांगणांत यावें लागलें होतें हें खरें. ही इच्छा कुणाची ? माहीत आहे ? अर्थात् ज्यांच्या कृपेची पाखर शिंद्यांना लाभली होती त्या इंग्रजांची ! इंग्रजांनीं नुकताच लासवारीच्या लढाईत त्याचा पराभव केला होता. त्यामुळें त्यानंतर झालेल्या तहानें तो त्यांच्या पूर्णपणें अंकित झाला होता. त्यानें कुणाशीं लढावें, केव्हां लढावें हें आतां इंग्रज ठरविणार होते. त्यानें किती फौज ठेवायची आणि त्यांत इंग्रज अधिकारी किती नेमावयाचे हेंसुद्धां इंग्रजांनीं ठरवावयाचें. या वेळीं इंग्रजांना होळकराशीं लढाई करावयाची होती. तोच एक मराठा सरदार अद्याप त्यांच्या गळाला लागला नव्हता. तो त्यांना बधत नव्हता. त्यांचे राजकारणी डाव तो उधळून टाकीत होता. इतकेंच नव्हे, तर भारताच्या मानचित्रावर पडलेले लाल इंग्रजी डाग तो पुसून टाकणार होता. आपल्या भारताला 'इंडिया' होऊं देण्यास तो तयार नव्हता. इंग्रज तर सारा भारत लाल करूं पाहात होते. त्यासाठीं होळकराचा अडसर त्यांना दूर करावयाचा होता. पण तो कसा करणार ? होळकरांशीं भांडण कसें उकरून काढावयाचें ? शिंद्यांच्या संरक्षणाचें कंकण त्यांनीं हातीं बांधलें असल्यामुळें त्यांना निमित्त मिळालें

शिंद्याला मदत करण्याच्या मिषानें. त्यांची फौज होळकराविरुद्ध उभी राहिली. आणि युद्धाला तोंड लागलें.

यशवंतराव गनिमी काव्यानें लढण्यांत निष्णात होता. गनिमी कावा हा खरा मराठ्यांच्या रक्तांत भिनलेला प्रकार. मराठ्यांची खरी शक्ति या गनिमी काव्यांत होती. मराठे जोंपर्यंत गनिमी काव्यानें लढत होते तोंपर्यंत इंग्रजांना त्यांचें भय वाटत होतें. डोंगरकपारीवरून सरसरत जाणाऱ्या मराठ्यांची पाठ त्यांना कधींच धरतां आली नाहीं. मराठे डोंगरदरी सोडून मैदानावर आले आणि इंग्रजांच्या समोरासमोरच्या हल्ल्याला बळी पडले असा इतिहास आहे.

यशवंतरानें मराठ्यांचें हें वर्म ओळखलें होतें. मराठ्यांच्या मरणाचा हा मार्ग त्यानें कधींच स्वीकारला नाहीं. त्याची सारी मदार होती त्याच्या चपळ घोडदळाच्या पथकावर. त्याचे घोडेस्वार माळव्याच्या प्रदेशांत सुसाट दौडूं लागले. शिंद्याच्या कवायती फौजेवर ते तुटून पडूं लागले. इंग्रज सेनापतींच्या कवायती पलटणीं-वर छुपे हल्ले करून त्यांना हैराण करूं लागले. इंग्रजांच्या तोफांचा कांहींच उपयोग होईना. होळकराचे सैनिक अचानक चालून येत आणि शिंद्याच्या आणि इंग्रजांच्या फौजांची लांडगेतोड करून पुन्हां विजेच्या वेगानें आडरस्त्यानें निघून जात. ते आले कोठून आणि गेले कोठें याचा पत्ताही लागत नसे.

शिंद्याचे सेनानी चिंतो आत्माराम घायाळ झाले. रामचंद्र बक्षी यांनीं होळकराला दोनदां पाठ दाखविली. हंड्याच्या घाटांत

शिंद्याची मोठी तुकडी कापली गेली. उज्जयिनीजवळ मोठें रण-कंदन झालें. त्यांत इंग्रज सेनापति जुरूस फिरंगी याचा साफ पराभव झाला. होळकराचा जोर वाढला. कोणाचीच डाळ शिजेना त्याच्यापुढें. इंग्रज टेकीस आले. इंदूरच्या लढाईत पुन्हां एकदां बेदम मार खाल्ल्यानंतर शिंदे दमला. होळकराला शरण जाण्या-शिवाय त्याला गत्यंतर नव्हतें. पेशव्याकडूनही लिहून आलें ‘ लढाई थांबवा. ’ पेशव्याची आज्ञा शिरसावंद्य मानून दौलतराव शिंद्यानें पांढरें निशाण फडकविलें.

शिंदे हटला. होळकर विजयी झाला. शिंद्याचा पराभव हा पेशव्याचाही पराभव, इंग्रजांनासुद्धां हा एक चांगलाच धडा होता.

## ५ आतां पेशवा

परंतु या पराभवानें पेशवा शहाणा झाला नाहीं. इंग्रजांनीं बोध घेतला नाहीं. पेशव्यानें होळकराला न्याय दिला नाहीं. इंग्रजांनीं न्यायाची बूज राखली नाहीं. होळकराला कुणाशींच वैर नको होतें. त्याला हवा होता फक्त न्याय !

पेशव्यानें होळकराचा सरंजाम जप्त केला होता. त्याची काळी आई हिरावून घेऊन त्यानें त्याच्या काळजाला हात घातला होता. मराठे सरदारांना त्यांचें वतन प्राणापेक्षांही प्रिय असे. कांहीं कारण नसतांना बाजीरावानें होळकराचें वतन काढून घेतलें होतें. शिंद्या-सारख्या नालायक दोस्ताला खूष करण्यासाठीं होळकरासारख्या कर्तृत्ववान् सरदाराशीं पेशव्यानें वैर मांडलें होतें. वास्तविक

पेशव्याच्या स्वतःच्या पायाखालची वाळू घसरत होती. पेशवाईच्या गळ्याला इंग्रजांचीं विषारी नखें लागूं पाहात होतीं. आपली सल्तनत धोक्यांत आहे हें त्या नादान पेशव्याला कळतें तर....? तर त्याची मिठी शिंद्यासारख्या दुबळ्या आणि लोभी माणसाच्या गळ्यांत न पडतां ती होळकराच्या गळ्यांत पडली असती !

पण तसें घडावयाचें नव्हतें. तसें घडलें नाहीं. बाजीरावानें यशवंतरावाला न्याय दिला नाहीं. त्याची समजूत काढण्याचाही प्रयत्न त्यानें कधीं केला नाहीं. तरीसुद्धां यशवंतरावानें आपल्या धन्यावर हात टाकला नाहीं. धन्याचा अपमान होईल असें एकही कृत्य त्यानें केलें नाहीं. धन्याकडे न्याय मागण्यासाठीं तो बारामती-पर्यंत आला. तेथील तळावरून त्यानें धन्याला निरोप पाठविला. त्यांत तो लिहितो.—" आपण धनी, आपणांशीं विरोध करण्याची माझी इच्छा नाहीं. शिंद्याचा व माझा समेट करून द्या. असा समेट झाला तरच इंग्रजावर दाब बसून राज्याचा बचाव होईल."

केवढा सूज्ञपणा हा ! आणि धोरणांतील समजूत तरी किती चांगली ! या निरोपाचा पेशव्याच्या मनावर कांहींच परिणाम झाला नाहीं असें नाहीं. त्यानें समेट करण्याची तयारीही केली. पण त्याचे बदसल्लागार मोठे बिलंदर ! तितकेच भेकड वृत्तीचे ! त्यांना हा समेटही नको होता आणि होळकराच्या समोर उभें राहाण्याचीही त्यांना भीति वाटत होती. पेशव्यानें बाळोबाला खूप सांगून पाहिलें. पण काय उपयोग ? बाळोबाला समेट नकोच होता. तो होळकराकडे कां जाईल ? बाजीरावाला समेट हवा होता म्हणून ?

छे, छे, बाजीराव अगदींच नेभळट, होळकराच्या धाकाला काय भ्यायचें ? तो कसला पुण्यावर चालून येतो ? येतो तर ये म्हणावें. आम्ही आहोंत तयार ! आम्ही आहोंत, आमचे शिंदे आहेत, आमचे नवे जिगर दोस्त इंग्रज आहेत ! होळकर फक्त होळीचे, त्यांनीं काय आमच्याशीं लढावें !

बाळोबाची ही मस्ती ! करामत शून्य असली तरी मिजास केवढी ! होळकराशीं बोलणीं करण्याची त्याची इच्छाच नव्हती. पण बाजीरावाचा आग्रह पडला. तेव्हां कांहीं तरी नाटक करायला हवें म्हणून त्यानें आपल्या हाताखालचीं अगदीं हलक्या दर्जाचीं दोन माणसें होळकराकडे पाठविलीं. समेटाचीं बोलणीं करण्यासाठीं ! होळकराची समजूत करण्यासाठीं !

होळकर भयंकर संतापला. त्याचा हा अपमान होता. अद्याप-पावेतों तो धन्याशीं नीट वागला होता. त्यानें आपली पायरी सोडली नव्हती. इतकेंच नव्हे तर धन्याशीं एकनिष्ठ राहाण्याचीच त्याची इच्छा होती. ती त्यानें व्यक्तही केली होती. असें असतांना समेट करणें तर राहोच, पण निदान सन्मानाची वागणूक तरी मिळावी ! यशवंतरावाचें अंतःकरण अपमानाच्या आगीनें विलक्षण भडकलें.

त्यानें पेशव्याच्या त्या माणसांचें तोंडही पाहिलें नाहीं. त्यांना त्यानें बाहेरच्या बाहेर हांकलून लाविलें. त्याला पेशव्याची चीड आली. त्याच्या दुबळेपणाचा त्याला भयंकर राग आला. त्याला त्याची कींवही वाटूं लागली. काय हा अधःपात ! नालायकांच्या

ओंजळीनें पाणी पिण्याची काय ही भेकड वृत्ति ! दिल्लीपतीच्या शाही सिंहासनावर धडक मारणाऱ्या भाऊसाहेबांच्या वंशांत असला नपुंसक निपजावा ना ? अरेरे, हिंदुपदपातशाहीची शान तर गेलीच पण जानही जाण्याच्या बेतांत असतांना इतकी बेफिकिरी प्रत्यक्ष धन्यानें दाखवावी ! अशा नालायक, बदफैली धन्याच्या पायाचे चाकर होऊन राहाण्यापेक्षां मरण पत्करलेलें काय वाईट ? असे अगतिकतेचे विचार त्याच्या डोक्यांत येऊं लागले. क्षणभर त्याचें डोकें सुन्न झालें. पण तें क्षणभरच !

त्यानें मनाचा निश्चय केला. धन्याशीं बेइमान व्हायचें नाहीं, पण धन्याला धडा दिल्याशिवाय राहायचें नाहीं. त्यानें पुण्यावर हल्ला करण्याची जय्यत तयारी केली. तरीपण प्रत्यक्ष तोफ डागली जाण्यापूर्वी त्यानें पेशव्याला एक निर्वाणीचा खलिता पाठविला. त्याचा थोडक्यांत आशय असा :—

"तुमच्याशीं मला लढायचें नाहीं. लढण्याचा प्रसंगच येऊं नये, अशी माझी इच्छा आहे. इतकेंही करून लढाईचा प्रसंग आला तर तींत तुम्ही स्वत: भाग घेऊं नये. शिंदे व आम्ही उभयतां पाहून घेऊं. तुमची लढाई बिघडली तर तुम्ही पुणें सोडून जाऊं नये. **तुम्हांस किंवा तुमचे माणसांस आमचेकडून तिळमात्र इजा पोंचणार नाहीं.** तुम्ही सिंद्याचे नादानें चालल्यामुळें राज्याचें नुकसान होऊन शत्रु बळावले आहेत. सिंद्यांचें हें दडपण दूर करण्यास मी समर्थ आहें. तुम्ही फक्त धनीपणाचें नातें सांभाळावें म्हणजे आम्ही सेवकांचें कार्य करून दाखवितों."

हा निर्वाणीचा निरोप ऐकून पेशवा गडबडला. होळकराचा सवाल सरळ होता. पण तो पेशव्याच्या मनाला रुचला नाहीं. त्याची समजूत घालण्याचें धैर्य तर त्याच्यापाशीं नव्हतेंच. मग त्याला तोंड देण्याचें सामर्थ्य कोठून येणार ? त्याच्या आवेशानें तो घाबरला. त्याला चिरडून टाकण्याच्या त्याच्या वल्गना साफ जिरून गेल्या. उलट कसेंही करून आपण त्याच्या तावडींतून निसटून दूर जावें असे विचार त्याच्या भेकड मनांत घोळूं लागले. विठोजीला मारल्याचें पाप त्याला आतां खाऊं लागलें.

प्रसंग मोठा बाका आला. पेशव्याचे सगळे साथीदार त्याच्यासारखेच नालायक व अविचारी होते. बाळाजी कुंजर जर स्वत: होळकराकडे बोलणी करण्यासाठीं गेला असता तर पुढचा सर्व अनर्थ टळला असता. वरकरणी तो कितीही आवेश आणो. आंतल्या आंत तोहि चांगलाच भेदरलेला होता. त्याच्याच मूर्खपणामुळें समेटाचा हा खेळ त्याच्या आंगलट आला होता. होळकर रणांगणावर उतरला होता. आतां पुढें काय ? मूर्ख आणि भ्याड माणसें जें करतात तेंच !

धनत्रयोदशीचा दिवस उजाडला. पेशव्याचें म्हणजेच बाळोबाचें सैन्य होळकराच्या सैन्याला तोंड देण्यासाठीं सिद्ध झालें. तो दिवस तयारींत गेला. पेशव्याला अर्थातच लढाईशीं कांहीं कर्तव्य नव्हतें. त्याचें सैन्य त्याच्यासाठीं लढणार होतें. त्याला सध्यां सवडही नव्हती. कारण त्याची होती दिवाळी. दिवाळीच्या दिवशीं लढाई करायची म्हणजे काय ?

नरकचतुर्दशीची ती रम्य पहाट पेशव्याच्या शनिवारवाड्यांत तरी हंसत हंसतच आली. दिवाळीच्या स्वयंपाकाची एकच गर्दी उडाली होती. खमंग पदार्थांचा घमघमाट साऱ्या वाड्याभर पसरला होता. मंगल स्नानाची धांदल काय विचारतां? सुवासिक उटणीं आणि सुगंधी तेलें यांची रेलचेल होती. उंची अत्तरांचे फावे तयार होत होते. कशाकशाचीही कमतरता नव्हती. भोगविलास हेंच ज्यांच्या जीवनाचें ध्येय त्यांना कशाची ददात असणार?

आज पेशवेही भल्या पहाटे उठले. दासदासींच्या सेवेंत त्यांचें स्नान उरकलें. दिवाळीचा फराळही आटोपला आणि ते लढाईची मौज पहाण्यासाठीं बाहेर पडले.

पुण्याच्या सीमेवर बाळोजीनें आपला तोफखाना आणून उभा केला. होळकराचें सैन्य तर केव्हांपासून तयार होतें. उजाडल्या-बरोबर लढाईला तोंड लागायचें. पण यशवंतरावानें पुन्हां एकदां शेवटचा निरोप पाठविला—" सहा घटका वाट पाहीन!" म्हणून लढाई थोडी लांबली.

यशवंतरावाचा हा प्रयत्नही फुकट गेला. त्याच्या निरोपाची पेशव्यानें मुळींच दखल घेतली नाहीं. त्याला सगळी गंमतच वाटत होती कीं काय न कळे! ठराविक वेळेपेक्षां थोडा अधिक वेळ वाट पाहूनही पेशव्याकडून सलोख्याचा हात पुढें येत नाहीं हें दिसतांच यशवंतरावानें आपल्या सैन्याला इशारा दिला. लढाई सुरू झाली.

श्रीमंत लांब उभे होते. शेजारी बाळोबाही होता. पण इतक्यांत खुद्द यशवंतरावाचा जोरदार हल्ला सुरू झाला. त्याबरोबर हे दोघेही वीर पर्वतीवर जाऊन बसले. उंच ठिकाणीं बसून पुणें कसें जळत होतें तें पाहण्यांत त्यांना मौज वाटली असेल.

यशवंतरावानें पहिली धडक मारली ती पेशव्याच्या तोफ-खान्यावर. त्यानें एका फटक्यांत त्याचे गोलंदाज ठार मारले. तोफखाना निकामी केला. नंतर तो शिंद्यांच्या फवायती फौजेवर त्वेषानें चालून गेला. शिंद्याची साडेपांच हजार फौज गारद झाली. शिंद्याचा सेनापति सदाशिवराव बक्षी ठार झाला. स्वतः यशवंत-रावानें शिपाईगिरीची शर्थ केली. सर्व रणांगण त्याच्या नजरेच्या धाकांत होतें. त्याचा उजवा डोळा आधींच एका लढाईत गेला होता. तरी लढाईचा कैफ चढलेला त्याचा डावा डोळा सारें रणांगण घारीच्या नजरेनें धुंडाळीत होता. शत्रूचीं मर्मस्थानें हेरीत होता. आणि आपल्या सैन्याकडून केवळ इशाऱ्यानें तो तीं नेमकीं टिपीत होता. दोन चार घटकांतच पेशव्याची बाजू आटोपली. लढाई अगदींच एकतर्फी झाली.

पण हें ठरलेलेंच होतें. सैन्याला प्रेरणा देणारे नेते पर्वतीवर जाऊन लपून बसले! मग दुसरें काय होणार? मेंदू निकामी झाला. पाय पळूं लागले. पायांचें काम पायांनीं केलें. पेशव्याची दिवाळी साजरी झाली. त्याबरोबर पुण्याची होळीही. होळकरानें केलेलें दारूकाम पाहून पेशव्याचे डोळे दिपले. त्याला पर्वतीवरही बसवेना. आपल्या दोस्तासह तो मागच्या मार्गें पळाला. होळकर पुण्यांत घुसला आणि पेशवा कोकणांत पळाला.

ही लढाई खुद्द पुणें शहरांत अशी झालीच नाहीं. ती पुण्याच्या सरहद्दीवर हडपसर, घोरपडी, वानवडी या भागांतच झाली. पुण्यांतील थोरामोठ्यांचे कांहीं वाडे जळाले इतकेंच. शिंद्याचे मात्र जे जे लोक यशवंतरावाच्या हातीं लागले त्यांना त्यानें बेदम मार दिला. पेशव्याशीं त्यानें थोडीसुद्धां दांडगाई केली नाहीं. बेइमानी केली नाहीं. उलट पेशव्याची पलायनाची मोहीम सुरू होतांच वाटेंत त्याला उपास घडूं नये म्हणून त्यानें भोजनाचें सारें साहित्य त्याच्याकडे पाठवून दिलें. असो.

यशवंतरावानें लढाई जिंकली खरी. पण पेशव्याला जिंकण्याचे सारे प्रयत्न फसले. पेशवा पर्वतीवरून जो पळाला तो पळतच सुटला. त्याचा पाय कोठेंच ठरेना. होळकराचा त्यानें विलक्षण धसका घेतला. तो आपला पाठलाग करील या भीतीनें त्याला ग्रासलें होतें. आपण त्याच्या हातीं सांपडलों तर तो आपल्याला जिवंत ठेवणार नाहीं असें त्याला वाटत होतें. विठोजीच्या खुनाचा बदला घेतल्याशिवाय तो राहाणार नाहीं अशी त्याची ठाम समजूत होती. भित्या पाठीमागें ब्रह्मराक्षस, तसें झालें.

त्यामुळें तो जो पळत सुटला तो थेट इंग्रजांकडे गेला. इंग्रजांनीं त्याला आनंदानें आश्रय दिला; शिवाय त्याला अभयही दिलें. तेव्हां त्याचा जीव भांड्यांत पडला. त्याला विलक्षण आनंद झाला. इंग्रज प्रबळ होते. न्यायी होते. प्रामाणिक होते. इतकेंच नव्हे तर पेशव्याच्या दृष्टीनें ते त्याला जीवदान देणारे थोर देवदूतच होते. देवदूत भेटल्यावर मानवाचें भय कशाला ?

अर्थात् पेशवा आतां निर्भय झाला. त्याला आतां होळकराचें भय राहिलें नाहीं. त्याबरोबर त्याला कशाची चाडही उरली नाहीं. देवदूतापुढें त्यानें लोटांगण घातलें. हिंदुपदपातशाहीचा हा पालक, दिल्लीपतीचा वकील-ई-मुत्लक आणि महाराष्ट्राच्या छत्रपतींचा हा पंतप्रधान इंग्रजांना शरण गेला! त्याच्या अकलेचें दिवाळें केव्हांच वाजलें होतें, तसेंच त्याच्या खजिन्याचेंही! पण आतां त्यानें आपला साडेतीन हात देह इंग्रजांपुढें पसरला. आपलें सारें राज्य त्यांच्या झोळींत टाकलें. आपलें जीवनसर्वस्व त्यांच्या स्वाधीन केलें!

इंग्रजांना नेमकें जें हवें होतें तें मिळालें. एवढी बलाढ्य पेशवाई आपल्या पायानें चालत त्यांच्याकडे आली. फार दिवसांचें त्यांचें स्वप्न साकार झालें. वसई येथें तहाच्या वाटाघाटी झाल्या. तह ठरला. पेशवा इंग्रजांचा मांडलिक झाला. इंग्रजांनीं त्याला मोठ्या संरक्षणाखालीं पुण्यांत आणिलें. आणि पेशव्याच्या गादी-शेजारीं इंग्रज रेसिडेन्टाची नवीन गादी मांडली गेली. पेशवाईचा दिमाख संपला.

इकडे यशवंतराव पुण्यांत पेशव्याची वाट पाहात थांबला होता. पण तो इंग्रजांच्या आश्रयाला गेल्याचें कळतांच त्यानें पुणें सोडलें. तो उत्तरेंत जाण्यासाठीं निघाला. जाण्यापूर्वीं तो बाजीरावाचें कुटुंब मातोश्री ताईसाहेब आणि अमृतरावाचें कुटुंब मातोश्री काकूसाहेब यांची भेट घेण्यास विसरला नाहीं. त्यानें त्यांच्या पायावर डोकें ठेवलें, त्यांना वस्त्रें दिलीं आणि त्यांचा प्रेमभरानें निरोप घेतला. असें होतें यशवंतरावांचें मन!

यशवंतराव उत्तरेंत गेला आणि इतक्यांत वसईच्या तहाचीं बातमी त्याच्या कानांवर आली. त्याच्या कानांवर त्याचा विश्वास बसेना. आपला धनी इंग्रजांना शरण जाण्याइतका नादान होईल असें त्याला वाटत नव्हतें. त्यानें ती दुष्ट बातमी ऐकली आणि त्याच्या अंगाचा नुसता तिळपापड झाला. आतां पेशव्यावर रागावण्यांत कांहीं अर्थच उरला नव्हता. कारण त्याचें अस्तित्व केवळ नांवाला होतें. आतां यशवंरावाचें लक्ष इंग्रजांकडे वळलें. वसईचा तह त्याला पूर्णपणें अमान्य होता. कसें झालें तरी तो पेशव्याचा सरदार होता. पेशवाईच्या रक्षणाची जबाबदारी त्याच्या शिरावर होती. ती तो विसरला नव्हता. त्यानें इंग्रजांना स्पष्ट कळवून टाकलें, ‘ वसईचा तह आम्हांला साफ नामंजूर आहे ’ आणि—

## ६ इंग्रजांशीं दोन हात

यशवंतरावाचे डोळे उघडले. पण ते फार उशिरां. यापूर्वींच ते उघडायला हवे होते. इंग्रजांच्या कपटी अंतःकरणाची ओळख व्हायला त्याला फार वेळ लागला. त्यांच्या कपटनीतीला एक वेळ तोही बळी पडला होताः शिंदे भोसले जेव्हां इंग्रजांविरुद्ध लढले तेव्हां तो तटस्थ राहिला. शिंद्यांशीं त्याचें वैर होतें हें खरें. पण इंग्रज हे एकट्या शिंद्याचे शत्रु नसून साऱ्या राष्ट्राचे शत्रु होते ही साधी गोष्ट त्याच्या त्या वेळीं ध्यानांत आली नाहीं. शिंदे-होळकरांचें वैर ही इंग्रजांना सुसंधीच होती. त्यांनीं तें वैर अधिकच वाढविलें आणि होळकर

मराठा-मंडळांतून फुटला. त्यानें शिंदे-भोसल्यांना इंग्रजांविरुद्ध लढण्यास मदत केली नाहीं. त्यामुळें इंग्रज विजयी व शिरजोर बनले.

यशवंतरावाला इंग्रजांच्या नीतीचें खरें दर्शन घडलें तें याच वेळीं. त्यानें वसईचा तह अमान्य असल्याचें इंग्रजांना यापूर्वीच कळविलें होतें. पण त्यांच्याकडून या बाबतींत समाधानकारक उत्तर मिळण्याची शक्यता नव्हती. उलट त्याला बंडखोर ठरवून त्याचा बंदोबस्त करण्याचेच मनसुबे ते रचीत होते. इंग्रजांचें 'फोडा व झोडा' हें धोरण सुविख्यातच होतें. होळकरासारख्या शहाण्या सरदारालाही तें प्रथमच कसें उमजलें नाहीं याचें आश्चर्य वाटतें. मराठामंडळांतून त्याला फोडतांना इंग्रजांनीं त्याला बरींच गोड गोड आश्वासनें दिलीं होतीं. त्याला तो भुलला. पण आतां ते तीं आश्वासनें पाळण्यास मुळींच तयार होईनात. हें पाहून तो तडकला.

त्यानें इंग्रजांना स्पष्ट बजावलें, " माझ्या न्याय्य हक्काला तुम्ही विरोध करीत आहांत हें बरें नव्हे. माझी जहागीर वडिलार्जित आहे. ती तुम्ही मान्य केलीच पाहिजे. शिवाय बाहेरच्या बऱ्याच मुलखांतून चौथाई वसूल करण्याचाही आमचा पिढीजात हक्क आहे. तोही तुम्ही मान्य केला पाहिजे. याखेरीज शिंद्यांच्या दुआबांतील व बुंदेलखंडातील प्रदेश तुम्ही मला द्यायचें कबूल केलें आहे. हीं सर्व आश्वासनें तुम्ही पाळलीं पाहिजेत. तें तुम्ही न कराल तर मला माझे न्याय्य हक्कासाठीं अन्य मार्गाचा अवलंब करावा लागेल हें तुम्ही लक्षांत ठेवा."

इंग्रज मोठे न्यायप्रिय असा डंका त्यांचा त्यांनींच वाजविला होता. भारतांत त्यांची ही न्यायप्रियता कधींच दिसली नाहीं. यशवंतरावाला तोच अनुभव आला. ते यशवंतरावाला ओळखीनासे झाले. काशीरावाबद्दल त्यांना अचानक कळवळा वाटूं लागला. त्याला यशवंतरावापासून फोडण्याचें त्यांनीं ठरविलें. त्याला संरक्षण द्यायचें आणि यशवंतरावाला झोडपायचें असा त्यांनीं बेत केला. त्याच्या साऱ्या मागण्या तर त्यांनीं धुडकावून लावल्याच. शिवाय 'यशवंतराव हा मोठा धाडसी, रणशूर आणि महत्त्वाकांक्षी असल्यामुळें त्याचें सामर्थ्य नष्ट करून टाकणें' त्यांना अत्यंत आवश्यक वाटलें. त्यांनीं त्याच्याशीं लढाई करण्याचा निश्चय केला.

उशिरां कां होईना, पण यशवंतरावाचे डोळे आतां चांगलेच उघडले. इंग्रजांच्या न्यायप्रियतेचें पितळ उघडें पडलें होतें. सत्तेला लालचावलेली त्यांची विषारी नजर होळकराच्या जहागिरीवर खिळून राहिली होती. सबंध भारताचाच घांस घेण्यासाठीं हीं इंग्रज गिधाडें टपून बसलीं होतीं. दुःखाची गोष्ट ही कीं भारताच्या सारीपाटावर इंग्रजांना अनुकूल फांसे पडूं लागले होते. इंग्रज विजयी होत होते.

यशवंतरावाचें स्वदेशप्रेम उफाळून आलें. आपल्या मातृभूमीचें सौभाग्य कलंकित होत असल्याचें पाहून त्याचें मन व्याकूळ झालें. इंग्रजांनीं तिच्या गळ्याभोंवतीं टाकलेला फांस उखडून टाकलाच पाहिजे असा त्यानें निर्धार केला. इंग्रजांना या देशांतून हाकलून देण्याच्या उद्योगाला तो लागला.

त्यानें नवीन सैन्याची जमवाजमव केली. निरनिराळ्या सरदारांना आपल्या बाजूला वळवून घेतलें. इंग्रजांच्या विरुद्ध एक बलाढ्य आघाडी उघडण्याचें त्यानें ठरविलें. त्यांत सर्वच कांहीं सामील झाले नाहींत. पण यशवंतरावाचा वाढता प्रभाव पाहून अनेकांनीं त्याला मदत केली. कांहीं शीख आले, जाटही आले, रोहिलेही येऊन मिळाले. आघाडी बळावत चालली. यशवंतरावानें अनेकांना पत्रें पाठविलीं. त्यांचा आशय लक्षांत घेतला कीं यशवंतरावाची भूमिका स्पष्ट होते.

परशुरामपंत प्रतिनिधीला पाठविलेल्या एका पत्रांत तो लिहितो "आजपर्यंत हिंदुराज्य सर्वत्रांनीं एकदिल होऊन चालविलें. अलीकडे ज्याचे त्याचे दौलतींत गृहकलह होऊन राज्यास विपर्यास पडून हिंदुधर्म नाहींसा होण्यास मूळ झालें. त्याचें छेदन करण्यास सर्वत्र एकदिल झालें पाहिजे . . . एकानेंच असा प्रकार करून सर्वत्रांनीं तमासे पाहून आपापली दौलत सांभाळून असावें, यांतील परिणाम कसा, हें मनीं विचारून ज्यांत हिंदुधर्माची कायमी व परिणामास नीट तें करावें. याचा विचार तुम्हासारख्यांनीं न केला तरी दुसरे कोण करतील?"

हिंदुपदपातशाहीचें रक्षण करणें हें यशवंतरावाचें ध्येय होतें. इंग्रजांच्या आक्रमणामुळें हिंदुधर्म व हिंदूंचें राज्य हीं धोक्यांत होतीं. हिंदु सरदार स्वार्थी झाले होते. ते आपल्या दौलतीच्या पलीकडे कांहीं पाहात नव्हते. दौलतीपेक्षां राष्ट्र मोठें आहे ही गोष्ट ते विसरले होते. राष्ट्र जगलें तर दौलत जगेल; राष्ट्र मेलें तर

दौलतही मरेल, हें साधें तत्त्व त्यांच्या लक्षांत येत नव्हतें. यशवंतरावानें या सर्व लोकांत राष्ट्रभक्ति निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांना स्वदेशासाठीं लढण्याचें त्यानें प्रोत्साहन दिलें आणि त्यांना आपल्या आघाडींत सामील करून घेऊन सर्वांचें एक संघटित सामर्थ्य निर्माण करण्याचे कसोशीनें प्रयत्न केले. झुंझार नेत्याला शोभेल असेंच त्याचें ध्येय होतें. झुंजार वीराला शोभेल असेंच त्याचें वर्तन होतें.

यशवंतरावानें आतांपर्यंत बऱ्याच लढाया केल्या. त्यांपैकीं बहुतेक लढायांत त्यानें प्रतिपक्षावर मातही केली. परंतु या सर्व लढाया स्वकीयांशीं झाल्या होत्या. तो शिंद्यांशीं लढला होता. पेशव्याच्या सैन्याशींही त्यानें मुकाबला केला होता. या दोघांशीं लढणें फार सोपें होतें. दौलतराव शिंदे आधींच कमकुवत आणि त्यांत इंग्रजांकडून मार खाल्लेला. पेशव्यांत तर मुळींच दम नव्हता. यामुळें या दोघांशीं झालेल्या लढायांत यशवंतरावाचा कस असा लागलाच नाहीं. त्यानें अगदीं सहजपणें त्यांना लोळविलें. पण आतां त्याची इंग्रजांशीं गांठ होती. परकीय शत्रूशीं त्याला आतां दोन हात करावयाचे होते. हा शत्रु जरी असामान्य नव्हता तरी तो अगदींच सामान्यही नव्हता. त्याच्या हाताचें बळ कमी असलें तरी त्याचें डोकें महाबिलंदर होतें. त्याची सारी मदार त्याच्या बुद्धिबळावर होती. हजारों कोसांवरून तो येथें आला आणि आल्यापासून विजयावर विजय मिळवीत गेला असें इतिहास सांगतो. पण हे विजय त्यानें बाहुबळावर मिळविले नाहींत. ते

त्यानें आपल्या मुत्सद्देगिरीच्या जोरावर मिळविले. केवळ राजकीय डावपेच करून त्यानें दक्षिणेंत टिपू निजामापासून तों दिल्लीच्या बादशहापर्यंत सर्वांना आपल्या पायापाशीं आणिलें. इंग्रजांनीं लढाया मारल्या, पण गंमत अशी कीं त्या सर्व लढायांत हिंदी सैनिकच त्यांनीं आपल्या बाजूंनीं लढविले. इंग्रजांसाठीं रक्त सांडलें हिंदी सैनिकांनीं. फारच थोडे इंग्रज त्यांत कामाला आले. हेंच तर त्यांच्या विजयाचें मर्म !

या वेळीं तर इंग्रज फारच प्रबळ होते. त्यांच्या इतका प्रबळ सत्ताधीश सबंध भारतांत कोणी उरला नव्हता. अनेक सत्ताधीशांच्या आणि सरदारांच्या पलटणी त्यांच्या तैनातींत होत्या. त्यांवर अधिकारी फक्त इंग्रज होते. तेव्हां अशा इंग्रजांशीं सामना देणें ही फार अवघड गोष्ट होती. यशवंतरावानें ती जिद्दीनें पत्करली होती. स्वदेशाच्या प्रेमामुळें प्रबळ इंग्रजांनाही आव्हान देण्यास तो कचरला नाहीं. सर्व परिस्थितीचा विचार करूनच तो रणांगणांत उतरला होता.

इंग्रजांशीं लढण्याची तयारी करतांना त्यानें दोन गोष्टींकडे विशेष कटाक्षानें लक्ष दिलें. प्रथम त्यानें आपल्या लष्करांतील युरोपियन् अंमलदारांना ताबडतोब कैद केलें. एकही इंग्रज वा फ्रेंच अधिकारी त्यानें आपल्या सैन्यांत ठेविला नाहीं. इतकेंच करून तो थांबला नाहीं. हे युरोपियन अधिकारी ऐनवेळीं फितुरी करून दगा देतात हें त्यानें अनेकदां अनुभविलें होतें. शिंदे-भोंसल्यांचा इंग्रजांनीं पराभव केला तो या फितुरांच्याच बळावर. स्वतः

होळकरालाही या फितुरीनें चांगलाच हात दाखविला होता. तेव्हां अशा या फितुरांची गय करून आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्यास तो मुळींच तयार नव्हता. त्यानें आपल्या सैन्यांतील असे फितूर टिपून घेतले आणि त्यांचा शिरच्छेद करून त्यांचीं मुंडकीं भर चव्हाट्यावर टांगून ठेविलीं. या फितुरांमध्यें कॅ टॉड्सारखे विख्यात अधिकारी सांपडले. त्यांनीं इंग्रज अधिकाऱ्यांना लिहिलेलीं गुप्त पत्रें यशवंतरावाच्या हातीं आलीं होतीं. त्यांची योग्य छाननी करून कॅ. टॉड्चाही शिरच्छेद करण्यांत आला. या गोष्टीमुळें सैन्यावर आणि विशेषतः अधिकाऱ्यांवर त्याचा चांगला वचक बसला. फितुरीचें किंवा विश्वासघाताचें एकही उदाहरण पुढें घडलें नाहीं.

## ७ सारी भिस्त घोड्याच्या खोगिरावर

यशवंतरावाचा दुसरा कटाक्ष म्हणजे गनिमी काव्याचा अवलंब. त्यानें पुढें तोफा ओतण्याचे कारखाने काढले हें खरें. पण अवजड तोफा आणि कवायती फौज यांवर त्याचें बिलकूल प्रेम नव्हतें. चपळ घोडेस्वारांवर त्याची सारी भिस्त होती. इंग्रज सेनापति लॉर्ड् लेक् याला यशवंतरावानें एक अंतिमोत्तर पाठविलें होतें. त्यांत त्यानें लिहिलें होतें — " तुम्ही होळकरांशीं सला करणें हेंच श्रेयस्कर. कारण रोहिले व इतर राजे त्यास सामील आहेत. खुद्द शिंदेही त्याच्या बाजूला येण्याचा संभव आहे. आज त्याच्या

हाताखालीं ४०००० रोहिले आहेत. शिवाय त्याचे दीड लाख घोडेस्वार वाटेल त्या ठिकाणीं हल्ला करण्यास सिद्ध आहेत होळकराला कशाचीहि पर्वा नाहीं. **आपला देश आणि आपली दौलत या सगळ्याबद्दलची भिस्त त्यानें आपल्या घोड्याच्या एका खोगिरावर ठेविली आहे.** तो आपल्या घोड्याचा लगाम ज्या दिशेकडे खेचील तिकडे त्याच्या सगळ्या घोडेस्वारांची धाड जाऊन पडेल."

यशवंतरावानें हे शब्द खरे करून दाखविले. गनिमी काव्याला घोडेस्वारांचाच फार उपयोग होतो. डोंगराच्या आणि दऱ्याखोऱ्यांच्या आश्रयाला राहून शत्रूवर छुपे हल्ले करणें, शत्रूला हूल दाखविण्यासाठीं एकदम पळून जाणें, पुन्हा पलट खाऊन हल्ला करणें यांसारख्या हालचालींना सुटसुटितपणा लागतो. तो डोंगराळ मुलखांत वावरणाऱ्या मराठ्यांच्या रक्तांतच भिनलेला होता. त्यांचीं भीमथडीं तट्टें वाऱ्यालाही मार्गे सारीत. उन्हाळ्यांतील रटरटणारें ऊन त्यांना थांबवूं शकत नसे. कडाक्याची थंडी त्यांचा मार्ग रोधूं शकत नसे. डोंगरपहाड ओलांडतांना तीं दमत नसत. चिखल तुडवितांना वा निसरड्यांवरून पळतांना तीं घसरून पडत नसत. मक्याचीं कणसें हातावर चोळून ओल्या मिरचीसंगें त्यांचे दाणे खात खात अटकेवर झेंडे लावणाऱ्या मावळे वीरांची सारी भिस्त त्यांच्या घोड्यांच्या खोगिरावरच होती. त्याच मावळ्यांच्या कुळांत जन्मलेल्या यशवंतरावालाही त्यांचा हा आवडता गनिमी कावा न आवडला तरच नवल ! त्यानें गनिमी काव्याचा अवलंब केला आणि इंग्रजांना नमविलें !

इंग्रजांना होळकराशीं लढाई कां हवी होती तें मागें सांगितलेंच आहे. होळकर अद्याप त्यांच्या जाळ्यांत सांपडला नव्हता आणि सांपडण्याचा संभवही नव्हता. शिवाय तो त्यांना त्याचा एकट्याचा नव्हे

## ८ इंग्रजांची पवित्र भूमिका

नर अखिल भारताचा शत्रु मानीत होता. अर्थात स्वदेशप्रेमानें भारलेला यशवंतराव होळकर आणि साम्राज्याच्या लोभानें लालसटलेले इंग्रज यांच्यामधला हा लढा होता. न्याय अन्यायाविरुद्ध लढण्यासाठीं खडा झाला होता. सत्य असत्याविरुद्ध लढण्यासाठीं सिद्ध झालें होतें. यशवंतराव न्यायाचा आणि सत्याचा प्रतिनिधी होता. इंग्रज अन्यायाचें आणि असत्याचें प्रतीक होते. असें असतांनाही लोकप्रियता मिळविण्यासाठीं इंग्रजांनीं चालविलेलें एक मोठें ढोंग या वेळीं उघडकीला आलें, त्यांनीं असा पुकारा केला कीं, होळकराच्या जहागिरीचा खरा वारसा काशीरावाचा असून दासीपुत्र यशवंतरावाचा त्यावर कसलाच हक्क नाहीं. तेव्हां खऱ्या वारसदारावर अन्याय होऊं न देणें हें इंग्रजांचें पवित्र कर्तव्य आहे. म्हणून यशवंतरावाविरुद्ध लढाई ही न्यायासाठीं व सत्यासाठीं आहे. शिवाय, होळकराचा पराभव केल्यावर त्याचें राज्य इंग्रज घेणार नव्हते म्हणे. इंग्रज त्या राज्याला शिवणार सुद्धां नव्हते. ते तें राज्य पेशवे आणि शिंदे यांना वांटून देणार होते ! आहे कीं नाहीं न्याय ? आणि वांटणीच्या वेळीं दोन बोकोबा भांडूं लागले तर ? — तर मग न्याय कसा द्यायचा हें काय माकडाला सांगायला पाहिजे ?

तेव्हा या लढ्यांत इंग्रजांनीं अशी सोज्ज्वळ आणि पवित्र भूमिका घेतली होती. आणि त्यांनीं लढाईची तयारी केली !

## ९ युद्धाला तोंड लागलें

या वेळीं लॉर्ड वेलस्ली हा गव्हर्नर जनरल होता. इंग्रजांच्या राजनीतीमध्यें तो निष्णात असल्याची त्याची ख्याति होती. इतर तथाकथित उच्च घराण्यांत जन्मलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांप्रमाणें हाहि अतिशय घमेंडखोर आणि अहंमन्य पुरूष होता. त्याच्या तडफदार धोरणामुळें इंग्रजांचें महत्त्व वाढलें कीं ओसरलें हें सांगणें कठीण आहे. एक गोष्ट खरी कीं तो आपली कामगिरी आटोपून विलायतेला परत गेला मात्र ! तेथील पार्लमेंटचे सभासद त्याच्यावर खवळून उठले. भारतांतील इंग्रजांचें राजकारण बिघडविल्याचा त्याच्यावर ठपका आला. तेथील टीकेचा भडिमार सहन करणें त्याला फार कठीण गेलें. यावरून असें म्हणतां येईल कीं त्याची भूमिका अन्यायाची होती व ती विलायतेंतील शहाण्या लोकांना मान्य नव्हती !

न्यायानें असो वा अन्यायानें असो, होळकराचा नायनाट करण्याचा वेलस्लीचा निश्चय होता. त्यानुसार त्यानें आपल्या निरनिराळ्या सैन्यांना हुकूम सोडले. लॉर्ड् लेक् नांवाच्या सेनानीकडे या युद्धाचें नेतृत्व देण्यांत आलें. त्यानें चार दिशांना चार सेनानायक नेमले व मोहीम सुरू झाली.

लॉर्ड वेलस्लीचा झुंजार भाऊ ज. वेलस्ली हा नर्मदेच्या दक्षिणे-कडून आपली फौज घेऊन निघाला. पश्चिमेकडून गुजराथेंतून क. मरे यानें माळव्याच्या दिशेनें कूच केलें. उत्तरेकडून स्वत: लॉर्ड लेक् होळकराच्या रोखानें चालला. पूर्व मोकळी होती. तिकडून इंग्रजांचे नवे दोस्त दौलतराव शिंदे यांच्या सैन्यानें चाल करावी अशी योजना होती. शिंद्याच्या सैन्यावर बापूसाहेब शिंदे आणि जॉन् बॅप्टिस्ट् या दोघांची नेमणूक करण्यांत आली होती, पण या दोघांचा मुळींच मेळ जमत नव्हता. शेवटीं बापूसाहेब शिंदे तर उघड उघड होळकरास जाऊन मिळाला. यामुळें शिंद्यांचें सैन्य इंग्रजांच्या दृष्टीनें कूचकामी ठरलें.

इंग्रजांचा व्यूह लक्षांत घेऊन यशवंतरावानें आपल्या सैन्याचीही तयारी केली. त्यानें आपल्या सैन्याच्या अनेक तुकड्या केल्या आणि त्या ठिकठिकाणीं विखरून ठेविल्या. त्यानें आपलें सगळें सैन्य एका ठिकाणीं असें ठेविलेंच नाहीं. कारण तसें करण्यांत फार मोठा धोका असतो. सगळें सैन्य कोंडलें जाण्याची भीति असते. तसें झालें तर सर्व सैन्याचें पानिपत होतें. मराठ्यांना हा अनुभव कांहीं नवा नव्हता ! शिवाय गनिमी काव्यानें लढणाऱ्या सैन्याला एकाच ठिकाणीं तळ ठोकून भागत नाहीं. शत्रूचा माग काढीत आणि त्याचा पिच्छा पुरवीत त्याला सतत दौडत राहावें लागतें. यशवंतरावाला गनिमी काव्यानेंच लढावयाचें होतें. त्यानें आपली एक तुकडी अमीरखानाच्या हाताखालीं बुंदेलखंडाच्या प्रदेशांत घुसविली व स्वतः घोडेस्वारांची एक तुकडी घेऊन आग्र्या-पासून नर्मदेपर्यंतच्या प्रदेशांत दौडत राहिला.

यशवंतरावाविषयीं इंग्रजांचे सर्वच अंदाज चुकीचे ठरले. त्याच्याजवळ पैसा नाहीं व त्यामुळें तो पुरेसें सैन्य ठेवूं शकणार नाहीं अशी इंग्रजांची कल्पना होती. पण या दोन्ही कल्पना चुकीच्या होत्या. त्याच्याजवळ भरपूर पैसा होता आणि भरपूर सैन्यही होतें. त्याचें सैन्यबळ तर एकसारखें वाढतच होतें. शिंद्याच्या सैन्यांतील बरेच लोक त्याला येऊन मिळाले होते. तो जसजसा विजय मिळवूं लागला तसतसे आणखी लोक त्याच्याभोंवतीं जमा होऊं लागले. इंग्रजांना यशवंतरावाचें खरें बळही समजलें नाहीं. त्याचें खरें मनही त्यांना कधीं उमजलें नाहीं. त्यामुळेंच त्यांना त्याच्या हातून फार मोठा पराभव खावा लागला.

रणनीतींतहि यशवंतराव इंग्रजांना भारी ठरला. लॉर्ड लेकनें आपल्या सैन्याच्या दोन तुकड्या ले. क. मॉनसन् व डॉन् यांच्या हाताखालीं देऊन होळकरावर पाठविल्या. क. मरेही गुजराथेंतून त्याच्या रोखानें निघाला. हीं दोन सैन्यें एकाच वेळीं चालून आल्यामुळें यशवंतराव त्यांच्या माऱ्यांत चांगलाच सांपडणार होता. पण त्याचें धैर्यही असामान्य होतें. आणि रणकौशल्यही अलौकिक होतें. इंग्रजांचा हा डाव त्यानें मोठ्या शिताफीनें उलटविला.

यशवंतरावाचें खरें रणक्षेत्र उत्तरेंत होतें. त्याला नर्मदेच्या दक्षिणेकडेही जावयाचें नव्हतें किंवा पश्चिमेकडे गुजराथच्या प्रदेशांतही युद्ध न्यावयाचें नव्हतें. परंतु चालून येणाऱ्या त्या दोन फौजांपैकीं कोणत्या तरी एका सैन्याची फळी फोडण्याशिवाय त्याला

गत्यंतर नव्हतें. त्यासाठीं त्यानें इंग्रजांवरच एक प्रतिडाव टाकला. त्याला खरोखर जिकडे जावयाचें होतें तिकडची बातमी त्यानें मुळींच बाहेर फुटूं दिली नाहीं, आणि जिकडे जावयाचें नव्हतें तिकडे हूल उठवून त्यानें शत्रूला चांगलेंच चकविलें. त्याला गुजराथेंत जावयाचें नव्हतें. तरी त्यानें तिकडे चालून जाण्याची हूल उठविली. त्याबरोबर क. मरेची गाळण उडाली. कारण होळकराच्या तुफानी माऱ्यापुढें आपला निभाव लागणार नाहीं हें तो जाणून होता. त्यानें लगेच आपलें पाऊल मागें घेतलें, आणि एका सुरक्षित ठिकाणीं तळ ठोकून तो स्वस्थ बसला.

यशवंतरावाचें काम झालें. बंदुकीची एक फैरही त्याला झाडावी लागली नाहीं, आणि त्याची पिछाडी पूर्ण सुरक्षित झाली. क. मॉनसन्‌ला तोंड देण्यास तो आतां मोकळा झाला.

## १० मुकुंदऱ्याची खिंड गर्जली

होळकराच्या हालचालींचें मुख्य केंद्र इंदूर किंवा महेश्वर या ठिकाणीं असावयाचें. पण गंमत अशी कीं या राजधानीच्या शहरांत त्याचें कधीं वास्तव्यच नसे. त्याचें सारें जीवन धावपळीचें असल्यामुळें तो एका जागीं फार काळ राहूंच शकत नसे. क. मरेच्या सैन्याला हूल दिल्यानंतर तो त्वरेनें उज्जयिनीकडे गेला. तसें करण्यांत त्याचा काय हेतु होता हें एकाही इंग्रज अधिकाऱ्याला कळलें नाहीं. क. मॉनसन्‌ तर चांगला फसला. होळकर इंग्रजांच्या

भीतीनें पळत सुटला आहे असा त्याचा समज झाला. त्यामुळें त्याचा पाठलाग करण्याचा त्याला मोह झाला आणि कसलाही विचार न करतां तो त्याच्या मागें निघाला.

पावसाळा सुरू झाला होता. या दिवसांत माळव्यांत मोहीम चालविणें हें इंग्रजांच्या दृष्टीनें चुकीचें होतें. लॉर्ड लेक् व ज. वेलस्ली यांनीं पावसाळा संपेपर्यंत सबुरी करण्याचें ठरविलें होतें. ज. वेलस्ली गप्पच बसला होता. लॉर्ड लेक्नेंही क. मॉनसन्ला माळव्यांत न उतरतां कोटा येथें तळ देऊन राहण्याचा हुकूम दिला होता. पण त्यानें तो मानला नाहीं. भलत्याच आशेनें तो यशवंतरावाचा पाठलाग करूं लागला आणि त्याच्या जाळ्यांत अडकला.

यशवंतराव पुढें पळत होता. प्रदेश डोंगराळ होता. नदीनाले दुथडी भरून वाहात होते. ठिकठिकाणीं चिखल सांचला होता. निसरडींही झालीं होतीं. पण ही सर्व अवस्था यशवंतरावाला सरावाची होती. तशी ती इंग्रजांना नव्हती. इतक्या जवळ अंतरावर असलेल्या यशवंतरावाला आपण सहज गाठूं अशा समजुतीनें क. मॉनसन् निघाला आणि त्याचा पाठलाग करीत करीत तो तीस मैल आंत आला. वाटेंत मुकुंदऱ्याची खिंड लागली. खिंडच ती. हिसका दाखविल्याशिवाय ती कशी राहील ? मोठ्या मेटाकुटीनें क. मॉनसन्चें सैन्य चढ चढून वर आलें. पण यशवंत-राव कशाला राहातो तेथें ? तो आधींच आणखी वीस मैल आंत सोनारा येथें गेला. मात्र जाण्यापूर्वी त्यानें क. मॉनसन्च्या वाटेंत

मोठमोठ धोंडे टाकून ठेविले, झाडें तोडून आडवीं टाकलीं आणि काट्याकुट्यांनीं आणि खड्ड्यांनीं सारा रस्ता निकामी करून ठेविला. क. मॉनसन्‌च्या सैन्याचे किती हाल झाले असतील याची सहज कल्पना करतां येईल.

या पहिल्या अनुभवानें तरी क. मॉनसन्‌नें शहाणे व्हावें ! पण त्याच्यापुढें काय वाढून ठेविलें होतें तें त्या बिचाऱ्याला कधीं कळलेंच नाहीं. यशवंतराव फक्त वीस मैलांवर होता. फक्त वीसच मैल ! सहज गाठतां येईल त्याला ! जाऊन जाऊन कोठें जाईल, किती पळेल ? कोठेंतरी थांबावेंच लागेल त्याला ! याच भ्रमांत होता तो !

त्यामुळें मुकुंदऱ्याची खिंड ओलांडून तो पुढें निघाला. यशवंतरावही मोठा वस्ताद. त्यानें भीतीचा घेतलेला बुरखा अजून काढलाच नाहीं. तो पळतच राहिला. वाटेंत एक किल्ला होता. त्याचें नांव हिंगलजगड. यशवंतरावाच्या मालकीचाच होता हा किल्ला. पण त्यावर त्यानें फारशी शिबंदी ठेविली नाहीं आणि त्याच्या रक्षणासाठींही न थांबतां तो पुढें गेला तसाच पळत. मागून येणाऱ्या क. मॉनसन्‌नें तो किल्ला अगदीं सहज हस्तगत केला. त्याला हा मोठा विजयच वाटला. त्याचा मोह आणखी वाढला. आणखी ३० मैल आंत गेला तो. पिंपळ्याच्या घाटापर्यंत गेला. यशवंतराव पलीकडेच होता त्याची वाट पाहात. क. मॉनसन् नेमका त्याच्या घशांत सांपडला.

यशवंतराव इतका वेळ स्वस्थ होता. किंबहुना तो पळत होता. आणि तोही इंग्रजांच्या भीतीनें म्हणे ! पण आतां या भीतीच्या बुरख्याची यशवंतरावाला गरज नव्हती. त्यानें तो फेंकून दिला आणि तो क. मॉनसन्‌च्या सैन्यावर अचानक उलटला. त्यानें त्या सैन्याची लांडगेतोड सुरू केली. अनेक सैनिक त्याच्या तलवारीला बळी पडले.

आतां मात्र मॉनसन् घाबरला. त्याच्या डोळ्यावरील धुंद उतरली. त्याची चूक त्याच्या लक्षांत आली. पण फार उशीर झाला होता. आतां सर्वनाश अटळ होता. यशवंतरावाचा नायनाट करणें तर राहीच; पण आपल्या कमींत कमी सैनिकांचा बळी देऊन त्या भयाण प्रसंगांतून शीरसलामत बाहेर कसें पडतां येईल याचाच तो विचार करूं लागला. पाऊस तर झोडपीतच होता. गुढगा गुढगा चिखलांतून तोफांचे गाडे इंचभरसुद्धां पुढें जात नव्हते. अन्नसामुग्रीही संपत आली होती आणि खूप आंत आल्या-मुळें मदतही मिळणें कठीण झालें होतें.

क. मॉनसन् मागें फिरला. आल्या वाटेनें परत जायचें फक्त. पण तेंही त्याला फार फार अवघड गेलें. निसर्ग आणि यशवंतराव दोघेही कोपले होते. वरून होणारा पावसाचा तुफानी मारा चुकवितां येत नव्हता. मागून पाठीवर बसणारे यशवंतरावाचे फटकारे हैराण करीत होते. मॉनसन्‌चें आक्रमण नदीनाल्यांना सहन होत नव्हतें. त्याच्या सैन्याला परतायला ते वाटच देत नव्हते. चंबळा, बनास या नद्यांनीं तर त्याच्या कितीतरी तोफा

बुडवून टाकल्या. कितीतरी शिपायांना आपल्या प्रवाहांतून वाहून नेऊन कायमची मुक्ति दिली. पावसाच्या अखंड धारा आणि होळकराच्या बंदुकीच्या गोळ्या मॉनसन्‌च्या सैनिकांना कंठस्नान घालीत होत्या. मॉनसन्‌ची व त्याच्या सैनिकांची हिंमत खचत चालली होती. कसेतरी धडपडत, ठेंचाळत आणि चिखल तुडवीत ती सारी सेना माघारी चालली होती. पावसांत भिजावें, थंडीनें कुडकुडावें आणि अन्नावांचून भुकेनें तडफडावें असा बांका प्रसंग त्या इंग्रज सैन्यावर येऊन गुदरला होता.

क. मॉनसन्‌च्या ह्या फजितीच्या वार्ता केव्हांच दूरवर जाऊन पोहोंचल्या होत्या. त्या ऐकून हिंदी बांधवांना खचितच आनंद झाला असेल. खाशी जिरली या इंग्रजांची ! भारताच्या राजकारणांत नाक खुपसणाऱ्या उपटसुंभांना अशीच अद्दल घडली पाहिजे ! असेच विचार त्या वेळीं लोकांच्या मनांत आले असतील; आणि यशवंतरावाविषयीं विलक्षण आदरभाव निर्माण झाला असेल ! कां होऊं नये ? तोच एकटा त्यांच्या आशाआकांक्षांचें स्थान होता. तोच स्वदेशाला परकीयांच्या मगरमिठींतून सोडविणारा एकमेव रक्षक उरला होता. इतके दिवस इंग्रजांची सरशी सरशी होत गेली होती. तिला रोखण्याचें बळ कोणांतही दिसत नव्हतें. लोक निराश झाले होते. पण यशवंतरावाच्या पराक्रमानें सारें पारडें फिरवून टाकलें. इंग्रज सेना पळते आहे आणि यशवंतराव तिला पिटाळतो आहे हें चित्र खरोखरच गुदगुल्या करणारें होतें.

हा बदल इंग्रजांना चांगलाच जाणवला. क. मॉनसन्‌ला

उपासमारीचे चांगलेच चटके बसूं लागले. इंग्रजांच्या पायाशीं लोटांगण घालीत आलेले अनेक राजे आणि सरदार आतां त्यांच्याकडे ढुंकून बघेनासे झाले. क. मॉनसन्‌ची एवढी उपासमार होत असतांना एकही राजा त्याच्या मदतीला आला नाहीं. कोट्याच्या राजानें इंग्रजांच्या सैन्याला शहरांत प्रवेश सुद्धां दिला नाहीं. जयपूरच्या राजानेंही तेंच केलें खुशालगड येथें तर इंग्रजांना फार मोठा धक्का बसला. शिंद्याची पलटण उघड उघड बंड करून उठली आणि तिनें मॉनसन्‌च्या सैन्याशीं लढाई सुरू केली. खुद्द मॉनसन्‌च्या सैन्यांतील एक पलटण यशवंतरावाला जाऊन मिळाली. क. मॉनसन्‌ला पळतां भुई थोडी झाली. पावणे-दोन महिने तो सारखा पळत होता. शेवटीं ३१ ऑगस्ट १८०४ ला त्याची ही पळण्याची मोहीम संपली. कसाबसा तो आग्र्याला जाऊन पोंचला. त्याची कमाई काय ? निम्म्या शिम्म्या शिपायांना जीवदान ! आणि सर्वांच्या सर्व युद्धसाहित्याला कायमची मुक्ति ! !

असे विजय सहजासहजीं मिळत नसतात. केवळ नशिबाच्या जोरावर यशवंतरावाला हे विजय मिळत नव्हते. ते त्याच्या पराक्रमाचें आणि कर्तृत्वाचें फळ होतें. त्याच्या शिपायांचें तो प्रिय दैवत होता. त्यांच्यावर तो आपल्या पोटच्या पोराप्रमाणें माया करी. प्रत्येक मोहिमेच्या वेळीं तो त्यांच्याबरोबर राही. प्रत्येक लढाईत तो स्वतः लढे. जेथून गोळे फेंकले जात तेथें तो हजर असे, आणि जेथें गोळे येऊन पडत तेथेंही तो हजर असे. तो घोडेस्वारांबरोबर घोड्यावर बसून दौडत जाई. पायदळाबरोबर

पायीं जाऊन तो शत्रूच्या गोटांत घुसे. तो पावसांत भिजे. चिखलांत रुते. थंडींत कुडकुडे आणि उन्हांत तडफडे. पण हें सारें जीवन तो आपल्या सैनिकांप्रमाणें त्यांच्यांत राहून जगत असे. अशा नेत्याला सैनिक देव कां बरें मानणार नाहींत ?

यशवंतरावाची तडफही विलक्षण होती. विश्रांतीची त्याला कधीं जरूरीच वाटत नसे. उलट शत्रूचें सैन्य विश्रांतीसाठीं थांबलें कीं याला चेव आलाच. मॉनसन् जेरीस आला तो यामुळेंच. ता जेव्हां जेव्हां विश्रांतीसाठीं थांबे तेव्हां तेव्हां यशवंतरावाची त्याच्यावर नेमकी धाड येई. त्याचें सैन्य नदी उतरून जाऊं लागलें कीं त्याला जलसमाधि द्यायला हा हजर ! इंग्रज सैन्याला कोठून रसद येऊं लागलीच तर यानें ती बळकावलीच !

झुंजार यशवंत हा असा होता. मुकुंदऱ्याच्या खिंडीनें त्याचा हा पराक्रम पहिला. ती पावन झाली. हर्षातिशयानें ती गरजली ' यशवंता, असाच यशवंत हो. जयवंत हो. '

---

मॉनसन्चा पाडाव झाला आणि यशवंतरावाचा हुरूप वाढला. त्याचें लक्ष आतां दिलीकडे लागलें. दिलीचा मार्ग मोकळा झाला असला तरी दिली अद्याप बरीच दूर होती. त्याला तें समजत होतें तरीही तो मोठ्या आवेशानें तिकडे निघाला. वाटेंत मथुरा लागली. कृष्णाची मथुरा इंग्रजांनीं विटाळली होती. इंग्रजांच्या अपवित्र पावलांनीं तिचें सारें पावित्र्य काळवंडलें

## ११ मथुरा कृष्णाची

होतें. मथुरेचें तें काळें रूप यशवंतरावाला पाहवत नव्हतें. त्यानें मथुरेंतील इंग्रज शिबंदीवर तडक चाल केली. इंग्रज सैन्य घाबरलें. मथुरा सोडून तें पळून गेलें. मथुरा यशवंतरावाच्या ताब्यांत आली.

मथुरेंतील लोकांना आनंद झाला. गोऱ्या लोकांच्या कारभाराला ते अतिशय कंटाळले होते. करांच्या ओझ्याखालीं ते वांकून गेले होते. स्वाभिमान साहेबाच्या बुटांच्या टांचांनीं लाथाडला होता. त्यांच्या स्वधर्माची प्रतिष्ठा साहेबानें कधींच धुडकाविली होती. त्याचें दुःख त्यांना अधिक होतें. कृष्णाच्या मथुरेंत कृष्णाच्या गाईचा वध राजरोसपणें होत होता. मथुरेंतील जनतेच्या मनाची फार मोठी व्यथा होती ती. त्यामुळेंच यशवंतरावानें इंग्रजांना हुसकावून लावून मथुरेची सुटका केल्यानें तेथील लोकांचीं अंतःकरणें त्याच्याविषयींच्या आदरानें आणि अभिमानानें भरून आलीं. कृष्णाची मथुरा पुन्हां एकदां कृष्णभजनांत तल्लीन झाली.

## १२ दिल्ली मात्र दूरच राहिली

यशवंतराव कांहीं दिवस मथुरेंतच राहिला. त्याची दृष्टि दिल्लीवर खिळून राहिली होती. दिल्लीच्या बादशहाला ताब्यांत घेण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. त्यानें पुन्हां आपलें सैन्य उभें केलें आणि लगेच दिल्लीकडे कूच केलें. इंग्रजांचा सेनापति जनरल ऑक्टरलोनी यानें दिल्लीच्या रक्षणाची जय्यत तयारी केली होती.

होळकरानें वेढा दिला. उभय बाजू नऊ दिवस निकरानें झुंजल्या. वेढा उठण्याचें चिन्ह कांहीं दिसेना. उलट होळकराचा जोर वाढण्याचींच लक्षणें दिसूं लागलीं. दिल्लींतील जनता होळकराचें स्वागत करण्यास आतुर होऊं लागली. कदाचित् बादशहाच्या मनांतही होळकराविषयीं प्रेम निर्माण झालें असावें. इंग्रजांना आधींपासूनच ही भीति वाटत होती. लोकांच्या मनाची चलबिचल होऊं न देणें जरूर होतें. बादशहालाही बिथरूं देणें योग्य नव्हतें. त्यासाठीं इंग्रजांनीं वाटेल ते उपाय योजले. लोकांना मेवामिठाई वाटली. लांचही दिली. बादशहालाही कांहीं आमिष दाखवून त्यांनीं गप्प बसविलें. यशवंतरावाच्या दुर्दैवानें याच वेळीं नेमकी उचल खाल्ली. ज. लेक् खूप मोठ्या सैन्यानिशीं ऑक्टरलोनीच्या मदतीला धावून आला. त्यामुळें यशवंतरावाला वेढा उठविणें भाग पडलें. त्यानें आपलें सैन्य भरतपूरकडे पाठवून दिलें आणि तो स्वतः शीखांची मदत मिळविण्यासाठीं लाहोरला गेला. शीख पडले मोठे इमानी! इंग्रजांनीं त्यांना आधींच फितवून ठेविलें होतें. त्यामुळें यशवंत-रावाला त्यांचें साहाय्य मिळविण्यांत यश मिळालें नाहीं,

एकूण दिल्ली दूरच राहिली आणि यशवंतरावाचें कार्य अपुरें राहिलें.

यशवंतरावाचें सैन्य भरतपूरकडे निघाल्याची वार्ता लेकला कळली. त्याबरोबर त्यानें मे. ज. फ्रेजर यास त्यावर रवाना केलें.

## १३ पराक्रमाचा कळस

फ्रेजरनें त्या सैन्याला दीगजवळ गाठलें मराठ्यांचें सैन्य दीगच्या किल्ल्याच्या बाहेर उतरणीवर तळ देऊन होतें. आपल्यावर इतक्या तडकाफडकीं इंग्रज सैन्य चालून येईल याची त्याला कल्पना नव्हती. त्यामुळें तें कांहींसें बेसावध होतें. शिवाय यांच्या तळाची जागाही अतिशय अडचणीची होती. एका बाजूला दलदल, दुसऱ्या बाजूला तलाव आणि मागील बाजूला किल्ला अशा चिंचोळ्या जागेंत तें सांपडलें. इंग्रजांचा हल्ला समोरून आला. हल्ला फार जोरदार होता. इंग्रजांच्या लांब पल्ल्याच्या तोफा मराठ्यांवर अखंड आग ओकीत होत्या. तरीही मराठ्यांनीं त्यांच्याशीं निकरानें झुंज दिली. घोडदळाच्या एका तुकडीनें इंग्रजांच्या आघाडीच्या तुकडीला मोठ्या शिताफीनें घेरलें. त्या तुकडीचा प्रमुख कॅ. नॉर्फर्ड ठार झाला. मराठे सैनिकांना अधिकच चेव आला. ते फ्रेजरच्या तुकडीवर तुटून पडले. खुद्द फ्रेजरच्या पायाला गोळी लागून पाय तुटला. याच दुखण्यानें पुढें तो मरणही पावला.

फ्रेजरची जागा क. मॉनसनूनें घेतली. मॉनसन हा खरा पडेल वीरगडी. मुकुंदऱ्याच्या खिंडींत होळकरानें याचा सपशेल पराभव केला होता. तरीही या वेळीं फ्रेजरच्या जागीं पुन्हां त्याचीच नेमणूक झाली. इंग्रजांची शिस्त वाखाणण्याजोगी होती. त्यांचे


दोन सेनापति लागोपाठ ठार झाले तरी सैन्यांत गोंधळ निर्माण झाला नाहीं. घबराटही झाली नाहीं. फ्रेजर गेला, मॉनसन आला. तरी त्यांच्या योजनेंत फरक पडला नाहीं.

मराठ्यांचा प्रतिकार तिखट होता यांत शंका नाहीं. तरीपण इंग्रजही लौकरच चांगले सांवरले आणि त्यांनीं पुन्हां मराठ्यांवर जोराचा हल्ला चढविला. आधींच अडचणीच्या जागेंत सांपडलेल्या मराठ्यांना त्या हल्ल्याला तोंड देणें कठीण गेलें आणि ते मागें मागें जात दीगच्या किल्ल्यांत घुसले.

इंग्रजांनीं किल्ल्याला वेढा दिला. ज. लेकही मॉनसनच्या मदतीला आला. इंग्रजांचें बळ वाढलें. मराठ्यांचें सैन्य आंत कोंडलें गेलें.

यशवंतराव होळकर शीखांची मदत मागण्यासाठीं गेला होता. दीगच्या या लढाईच्या वेळीं तो हजर नव्हता. त्याला ही लढाईची हकिकत फरुकाबाद येथें समजली. त्याबरोबर तो तडक आपलें घोडदळाचें पथक घेऊन निघाला आणि दीगच्या किल्ल्याला वेढा देणाऱ्या इंग्रज फौजेवर चालून गेला. यशवंतरावाचा मारा फार भयंकर होता, त्या माऱ्यापुढें इंग्रजांचा वेढा ढिला पडला. या संधीचा फायदा घेऊन किल्ल्यांत अडकलेलें सैन्य बाहेर पडलें व भरतपूरकडे निघून गेलें.

भरतपूरचा किल्ला मोठाही होता आणि बळकटही होता. एक अभेद्य किल्ला म्हणून त्याची ख्याति होती मराठ्यांनीं या किल्ल्याकडें धाव घेतली ती यामुळेंच. शिवाय या किल्ल्याबद्दल



भरतपूरचा किल्ला

त्यांना आगळें प्रेम वाटत होतें. कां बरें ? माहीत आहे ? भरतपूर या नांवाकडे पहा.

हें शहर रामचंद्राचा भाऊ भरत यानें वसविलें होतें. प्रभु रामचंद्र आणि त्याचा निष्ठावंत भाऊ भरत यांच्याविषयीं आदरभाव न वाटणारा माणूस भारतांत विरळा. अशा श्रेष्ठ पूर्वजांचें वास्तव्य ज्या स्थानाला लाभलें त्या स्थानाविषयींही प्रेम वाटणारच. मथुरा जशी श्रीकृष्णाची, तसें भरतपूर भरताचें ! त्या पवित्र भरतपूरच्या आश्रयाला मराठे धावत आले.

यावेळीं भरतपूर जाटांच्या ताब्यांत होतें. जाट हे मूळचे डोंगरी लोक. मराठ्यांसारखेच काटक आणि लढवय्ये. पण तूर्त त्यांची अवस्था सुद्धां मराठ्यांसारखीच झाली होती. तेही इंग्रजांच्या तैनाती तहाच्या पाशांत पुरे अडकले होते. रणजितसिंग हा जाटांचा पुढारी होता. इंग्रजांशीं दोस्तीचा तह करतांना त्याचें स्वत्व मेलें होतें. पण यशवंतरावानें त्याच इंग्रजांवर विजय मिळविल्याबरोबर त्याचें स्वत्व पुन्हां जिवंत झालें. त्याचा स्वाभिमान पुन्हां उफाळून वर आला. त्यानें इंग्रजांशीं केलेला तह मोडला आणि तो आपल्या प्रिय मातृभूमीशीं जन्मतःच केलेला तह पाळण्यास सिद्ध झाला.

भरतपूरचा किल्ला हा भरतपूर शहराच्या अगदीं नजीक होता. शहराचाच एक भाग होता तो. तो उंच डोंगरावर विराजमान झाला होता. किल्ल्याच्या तटाची भिंत ८० फूट उंच असून ती दगडी होती. या भिंतीवर तितक्याच उंचीची आणखी एक दगडी

भिंत. होती. किल्ल्याला ९ दरवाजे होते. किल्ल्याच्या भोंवतालीं १५ फूट रुंद आणि खूप खोल खंदक होता. तो नेहमीं पाण्यानें तुडुंब भरलेला असे. किल्ल्याच्या आंत पाण्याचा एक मोठा तलाव होता. त्या तलावांतील पाणी खंदकांत सोडण्याची भूमिगत व्यवस्था केलेली होती. या वर्णनावरून हा किल्ला किती भक्कम होता हें सहज समजून येण्यासारखें आहे.

मराठ्यांचें सैन्य या किल्ल्यावर पोहोचूं शकलें याचाच इंग्रजांना मोठा पोटशूळ होता. आतां मराठ्यांना तेथून हुसकणें ही गोष्ट केवळ अशक्य होती. मराठ्यांचें सैन्य किल्ल्यांत सुरक्षित होतें हें तर खरेंच. शिवाय यशवंतराव होळकर आपल्या घोडदळासह किल्ल्या-बाहेर होता हें तर भयानक संकट इंग्रजांच्या मागें भुतासारखें लागलें होतें. तरीही त्यांनीं किल्ला लढविण्याचा बेत नक्की केला व ते कामाला लागले.

इंग्रजांची सारी भिस्त त्यांच्या तोफखान्यावर होती. तोफांचे गोळे फेकून तटाला खिंडार पाडल्याशिवाय किल्ल्यांत प्रवेश मिळणें शक्य नव्हतें. कारण किल्ल्यावर भरपूर शिबंदी होती आणि किल्ल्याचा बंदोबस्तही भक्कम होता. तोफा फार जवळ नेण्याची सोय नव्हती. कारण किल्ल्यावरील गोलंदाज अगदीं टपून बसले होते. शत्रूच्या तोफा माऱ्याच्या टप्प्यांत येण्याचा अवकाश. वरून अचूक सरबत्ती सुरू होई आणि त्या निकामी होत. बरें, किल्ल्याला सर्व बाजूंनीं घेरून मराठ्यांच्या सैन्याला कोंडून टाकावें तरी पंचाईत. कारण तो बिलंदर यशवंतराव होळकर मुद्दामच

किल्ल्याच्या बाहेर राहिला होता. तो केव्हां आणि कोणत्या बाजूला धाड घालील याचा नेम नव्हता. असे अनेक पेंचप्रसंग इंग्रजांपुढें होते. ते सारे लक्षांत घेऊन इंग्रजांनीं ही मोहीम हातीं घेतली होती आणि ती यशस्वी करण्याचा त्यांचा निर्धारही पक्का होता. त्यांनीं चार जबरदस्त हल्ले किल्ल्यावर केले. अगदीं लागोपाठ केले. परंतु प्रत्येक हल्ला मराठ्यांनीं मोडून काढला आणि शेवटीं इंग्रजांना माघार घेणें भाग पडलें.

इंग्रजांचा पराभव झाला खरा. पण त्यांनीं अवलंबिलेलें युद्धाचें तंत्र आणि त्यांचे चिकाटीचे साहसी प्रयत्न खरोखरच वाखाणण्यासारखे होते. यशवंतरावासारखा रणधुरंधर सेनानी मराठ्यांचें नेतृत्व करीत होता म्हणूनच केवळ इंग्रजांचें तंत्र फसलें आणि रणदेवतेनें मराठ्यांच्या बाजूनें कौल दिला. या सर्वच दृष्टींनीं अद्वितीय ठरलेल्या लढाईचें सविस्तर वर्णन कितीही मनोरंजक असलें तरी तें या ठिकाणीं देणें योग्य होणार नाहीं. या पुस्तकाचा तो हेतूही नाहीं. तरीपण या लढाईचें भव्य स्वरूप कळावें यासाठीं पुढें दिलेली ही महत्त्वाची हकिकत तितकीच मनोरंजक वाटेल यांत शंका नाहीं.

दि. ९ जानेवारी, १८०५. सकाळची वेळ होती. इंग्रजांच्या छावणींत शंखनाद सुरू झाला. शंखनाद म्हणजे ब्यूगल् कॉल् बरें का? सैनिक रणवेष चढवून तयार झाले. सारें वातावरण उत्साहानें भरून गेलें. सेनापतींनीं हुकूम दिला 'बढे चलो.' (क्विक् मार्च). सैनिक चालूं लागले. ती कवायती सेना होती. हुकुमाप्रमाणें वागणारी.

पुढें म्हणजे पुढेंच जाणारी. मग समोर मृत्यूचा भयाण जबडा दिसला तरी मागें न फिरणारी! सेना किल्ल्याच्या रोखानें निघाली. ठराविक अंतर चालून गेल्यावर तिला थांबण्याचा हुकूम झाला. ती थांबली. सेनापतीच्या योजनेप्रमाणें ती पांगली. तोफांचे मोर्चे उभारले गेले. आणि हुकूम होतांच तोफा डागल्या गेल्या. धडाड धुम्, धडाड धुम्, वातावरण धुंद झालें. सारी सृष्टि रण-चंडिकेच्या उग्र अवतारानें बेभान झाली. सारा भूतल हादरून गेला. इंग्रजांचे गोलंदाज किल्ल्याच्या तटावर आग ओकीत होते. तटाचे दगड त्या आगीचे लोळ हंसत हंसत झेलीत होते. फुलें झेलावींत ना, तितक्याच आनंदानें! आगीच्या गोळ्यांना फुलें समजणारे ते दगड वेडेच नव्हेत का? होय, वेडेच! देशप्रेमानें तेही वेडे झाले होते. त्यांच्यामागें उभ्या असलेल्या त्या निधड्या छातीच्या वीरांसारखेच! मनुष्य आणि निसर्ग यांचा इतका सुंदर मिलाफ क्वचितच आढळतो.

युद्ध चांगलेंच भडकलें. गोळ्यांना गोळ्यांनींच उत्तर मिळत होतें. दोन दिवस सतत भडिमार झाल्यावर किल्ल्याच्या तटाला एक लहानसें खिंडार पडलें. इंग्रजांची आशा पालवली. त्या खिंडारांतून आपण सहज किल्ल्यांत घुसूं शकूं असें त्यांना वाटूं लागलें. रात्र झाली. अंधार पडला. इंग्रजांची एक तुकडी पुढें पुढें सरकूं लागली. ती तटाच्या अगदीं जवळ आली. त्या खिंडारा-पासून कांहीं पावलांच्या अंतरावर आली ती. आणि—आणि किल्ल्यावरून एकदम गोळीबार सुरू झाला. त्यांच्या हालचालीकडे

बारीक लक्ष असलेल्या मराठे सैनिकांनीं इंग्रजांचा एक एक शिपाई टिपून मारला. सगळेच्या सगळे शिपाई गारद झाले. क. मेटलंड व इतर अधिकारीही ठार झाले. इंग्रजांचा पराभव झाला.

इंग्रजांनीं पुन्हां तयारी केली. २१ जानेवारीला दुसरा हल्ला सुरू झाला. या वेळीं इंग्रज थोडे सावध झाले होते. खिंडार पडलें तरी एकदम प्रवेश करण्याचा प्रयत्न करावयाचा नाहीं असें त्यांनीं ठरविलें होतें. मोठ्या प्रयासांनीं त्यांनीं दोन दिवसांत खिंडार तर पाडलें. पण पुढें जाण्यापूर्वी त्यांनीं त्या खंदकाचें मोजमाप घेण्याचें ठरविलें. तेंही काम तितकें सोपें नव्हतें. पण त्याकरितां त्यांनीं एक सुंदर कपटनाटक रचलें. तीन देशी शिपाई साध्या वेषांत घोड्यावर बसून किल्ल्याकडे निघाले. ते पुढें दौडत होते आणि त्यांचा पाठलाग करण्याचें नाटक करीत दुसरी एक इंग्रज शिपायांची तुकडी त्यांच्यामागें दौडत होती. पुढें दौडणाऱ्या त्या शिपायांवर ती गोळ्याही झाडीत होती. नुसते वायबारच होते ते. पण किल्ल्यावरून पहाणाऱ्यांना मात्र वाटलें कीं, हें सारें खरेंच आहे. ते तीन शिपाई किल्ल्यापाशीं आले आणि ओरडून म्हणूं लागले, "आम्ही इंग्रजांची चाकरी सोडून आलों आहोंत. आम्हांला आंत घ्या."

त्यांनीं बहाणा तर चांगला केला. किल्ल्यावरील सैनिक फसले. त्यांनीं त्यांना दरवाजाकडे जाण्यास सांगितलें. दरवाजाकडे जातां जातां त्यांनीं खंदकाची नीट पहाणी केली. त्यांचें काम झालें. त्याबरोबर ते मोठ्या वेगानें आपल्या छावणीकडे परत पळाले. आतां मात्र किल्ल्यावरचे लोक चमकले. सारा प्रकार त्यांच्या लक्षांत यायला मुळींच वेळ लागला नाहीं.

छावणींत आल्याबरोबर त्यांनीं आपल्या अधिकाऱ्यांना माहिती दिली. ' खंदक फारसा रुंद नाहीं आणि फार खोलही नाहीं. तटाला पडलेलें खिंडारही बरेंच खालीं आहे. त्यांतून किल्ल्यांत प्रवेश करणें फार सोपें आहे. ' इ० इ० अधिकारी खूष झाले. त्यांनीं त्या शिपायांना रु. ५००० बक्षीस दिले. आणखी काय पाहिजे ?

हल्ल्याची तयारी झाली. वरील माहितीच्या आधारानें लाकडी शिड्या तयार करण्यांत आल्या. आणि इंग्रजांच्या सैनिकांची एक मोठी तुकडी किल्ल्याकडे निघाली. मराठे सैनिक तयारींतच होते. इंग्रजांचा हल्ला कोठून आणि कसा होईल याची त्यांना चांगली कल्पना होती. ते नीट दबा धरून राहिले. या हल्ल्याची माहिती यशवंतरावालाही मिळाली. किल्लेदार आणि यशवंतराव यांच्या दरम्यान एक प्रभावी तारायंत्र सतत काम करीत असावें. कारण इंग्रजांच्या प्रत्येक हल्ल्याला आंतून आणि बाहेरून एकाच वेळीं उत्तर मिळत होतें. या वेळीं सुद्धां तेंच झालें.

इंग्रज सैन्य दमादमानें पुढें चाललें होतें. गंमत अशी कीं त्यांना थोडाही प्रतिकार होत नव्हता. मराठ्यांचा हा शांतपणा त्यांना आंतल्या आंत भेडसावीत होता. तरी ते तसेच धीरानें पुढें जात होते. थोड्याच वेळांत ते त्या खंदकाशर्शी येऊन पोंचले. पाहातात तों काय ? खंदक पाण्यानें कांठोकांठ भरलेला. त्याची रुंदी तर खूपच वाढलेली. शिड्या अपुऱ्या पडूं लागल्या. आतां काय करावें ? या मराठ्यांनीं चांगलीच मात केली कीं ? त्यांनीं

आंतील तलावाचें बरेंच पाणी खंदकांत सोडून दिलें वाटतें ? इंग्रज सैनिक पाण्यांत उतरले. पण खोलीही वाढलेली. पोहून जाण्या-शिवाय गत्यंतर नव्हतें. उतरले पाण्यांत आणि पोहूं लागले.

आणि वरून एकाएकीं गोळ्यांचा वर्षाव सुरू झाला. दुसऱ्या बाजूनें होळकराची तुकडीही त्यांच्यावर तुटून पडली. इंग्रज सैन्याचें धाबें दणाणलें. त्याला पुढें जातां येईना. मागें परततां येईना. तें सैरावैरां पळूं लागलें. पण अखेर तें होळकराच्या तलवारीला बळी पडले. इंग्रजांचे १८ अधिकारी आणि शेंकडों सैनिक या लढाईत पडले.

आणखी एक महिना गेला. इंग्रजांच्या डोक्यांतून एक नवीन शक्कल निघाली. छावणीपासून तटापर्यंत जाणारा असा एक खंदक त्यांनीं खणून काढला. त्यांत तोफांचे मोर्चे उभारले. डाव असा कीं तोफांचा भडिमार सुरू करावयाचा व त्याच वेळीं त्याच्या छायेखालीं सैनिकांनीं सरकत सरकत पुढें जावयाचें. किती सोपें काम ! किल्ल्याचा तट चढून जाईपर्यंत कुणाला सुद्धां कळणार नाहीं ! मराठ्यांना म्हणावें आतां बघाच आमची करामत ! आम्ही किल्ला आतां अगदीं नक्की घेणार ! मराठे मनांत म्हणत होते, ‘ घेणार तर घ्या बाबांनो ! तुम्ही घ्यायचाच ठरवलात तर आमचें काय चालणार तुमच्यापुढें ? ’

इंग्रजांचा खंदक तयार झाला आणि काम करणारे सारे सैनिक रात्रीं विश्रांतीसाठीं छावणीकडे परत गेले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मोहीम सुरू करावयाची. सबंध रात्र जायची होती. घाई कशाला ?

रात्रीं छान विश्रांति घेतली त्यांनीं ! पण – पण त्या विश्रांतीनेंच त्यांना दगा दिला. सकाळीं ठरल्याप्रमाणें इंग्रजांचें सैन्य खंदकांत जाऊन पोहोंचलें. तों काय आश्चर्य ; सारा खंदक मराठा सैनिकांनीं आधींच व्यापलेला ! झाली फजिती ! पुरती उसंत मिळण्याच्या आंतच इंग्रज सैनिकांची पुरती वाट लागली !

हें असें एकसारखें चाललें होतें. इंग्रजांनीं एखादा बेत करावा आणि होळकरानें तो उधळून लावा. लॉर्ड् लेक अगदीं जेरीस आला. ज. वेलस्लीचीं सारखीं तगाद्याचीं पत्रें येत होतीं. ' किल्ला लौकर ताब्यांत घ्या आणि होळकराला हुसकावून लावा ! ' हो, सगळें खरें. पण हें घडावें कसें ? होळकर काय दौलतराव शिंद्या-सारखा लेचापेचा होता कीं बाजीरावासारखा नामर्द होता ? तरी पण लॉर्ड् लेकनें त्याला कळवून टाकलें, ' आतां अगदीं लौकरच घेतों किल्ला. '

आणि नव्या चढाईची आंखणी सुरू झाली. आतां किल्ल्यावर एकदम निकराचा हल्ला करण्याचें इंग्रजांनीं ठरविलें. या कामीं पुन्हां क. मॉसननचीच नेमणूक करण्यांत आली. मॉनसननें भली मोठी सेना बरोबर घेतली आणि तो मोठ्या आवेशानें किल्ल्यावर चालून गेला. तोफांचे नवीन मोर्चे नवीन जागीं उभारले, आणि तटावर भडिमार सुरू केला.त्या जोराच्या भडिमारामुळें एका बुरुजाला भगदाड पडलें. त्याबरोबर इंग्रज सेना तिकडे घुसली. त्या भगदाडां-तून किल्ल्यांत घुसणें त्यांना शक्य झालें नाहीं. कारण मराठ्यांचा प्रतिकार कडवा होता. तरीपण त्या भगदाडाचा आश्रय त्यांना

घेतां आला. येथून त्यांनीं भिंतीवरून चढून जाण्याचा धाडसी प्रयत्न केला. एक एक सैनिक भिंतींत संगिनी रोवून वर चढूं लागला. पण वरचे लोक कांहीं स्वस्थ बसले नव्हते. त्यांनीं त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्यांच्या अंगावर लाकडाचे पेटलेले ओंडके टाकले. मडक्यांत दारू भरून तीं पेटवून खालीं फेंकलीं. नाना प्रकारांनीं त्यांनीं त्या इंग्रजांना हैराण केलें. मराठ्यांच्या त्या भयंकर प्रतिकारामुळें इंग्रजांचें अपरिमित नुकसान झालें. त्यांचे तीन हजारांहून अधिक लोक मारले गेले. त्यांचा दारूगोळा संपला. धान्यसामुग्रीही खलास झाली. शिवाय सर्व जगांत ते बदनाम झाले तें निराळें. एवढें प्रचंड लष्कर जवळ असूनही इंग्रजांचा पराभव झाला. भरतपूरनें इंग्रजांच्या सामर्थ्याला भयंकर धक्का दिला. इंग्रजांना माघार घ्यावी लागली.

बखरकार लिहितात, ' अठरा हल्ले आले. अठराही हल्ले आंतून जाठ बाहेरून होळकर यांनीं मारून काढले. इंग्रज पलटणांचा शेणसडा झाला ! ' अशी ही इंग्रजांची अपमानास्पद माघार ! !

माघार ? होय, इंग्रजांची माघार ! सर्वत्र विजयी होत गेलेल्या इंग्रजांची माघार ! इंग्रज हतबल झाले. लॉर्ड् लेक्, ज. मॉनसन्, ज. वेलस्ली यांच्यासारखे रणधुरंधर त्यांच्यापाशीं होते. उत्कृष्ट तोफखाना त्यांच्या दिमतीला होता. हरकामासाठीं लागणारे बुणगे त्यांच्यापाशीं किती होते त्याला गणतीच नव्हती. तरीही इंग्रजांना माघार घ्यावी लागली. तीही त्यांच्या दृष्टीनें यःकश्चित् असलेल्या

यशवंतराव होळकरापुढें! यशवंतरावानें इंग्रजांस दमविलें! भरतपूरच्या लहानशा किल्ल्यानें त्यांना नमविलें!

इंग्रजांची ही माघार बोलकी होती. तिनें भारतांत इंग्रजांची नाचक्की केली ती केलीच. शिवाय तिकडे विलायतेंतही तिनें प्रचंड वादळ उठविलें. पार्लमेंट संतापली. साहेब लोक गरम झाले. ग. ज. लॉर्ड् वेलस्लीला ताबडतोब परत बोलावलें गेलें. त्याचा नक्षा साफ उतरला. त्याच्या मग्रूरीच्या वागण्यामुळें हा प्रसंग ओढवला असें विलायतेंतील लोकमत होतें. तें लक्षांत घेऊनच कंपनी सरकारनें त्याला तावडतोब दूर केलें आणि लॉर्ड् कॉर्नवॉलिस् यास त्याच्या जागीं पाठविलें.

लॉर्ड् कॉर्नवालिस वयानें म्हातारा असला तरी सूज्ञ होता. भारतांतील परिस्थितीची त्याला चांगली ओळख होती. त्यानें इकडे आल्याबरोबर प्रथम कोणती गोष्ट केली असेल? अर्थात् युद्ध थांबविणें ही. त्यानें होळकराशीं चाललेलें युद्ध तर थाबविलेंच. शिवाय त्यानें त्याच्याशीं तह करून त्याच्या साऱ्या मागण्या मान्य केल्या. त्याची सर्व जहागीर त्याच्याकडे कायम केली, आणि लढाईचें मूळ कारणच संपलें.

तह झाला. इंग्रज व होळकर त्यांच्यात राजपूर घाट येथें तह झाला. दि. २४ डिसेंबर १८०५. एक अशक्य वाटणारी घटना शक्य झाली. पण गंमत अशी कीं हा तह इंग्रजांनीं केला. त्यांना हवा होता म्हणून केला. होळकराला हवा होता म्हणून नव्हे. होळकराला तहही नको होता आणि इंग्रजही नको होते. इंग्रजांनीं तह केल्यामुळें त्याची बाजू अधिकच बळकट झाली. त्याची जहागीर तर त्याला मिळाली. पण त्याहीपेक्षां त्याचें देशांत वजन वाढलें. त्याच्या पक्षाला जाऊन मिळावें असें अनेकांना वाटूं लागलें. सर्वांनीं एकजूट करून इंग्रजांना या देशा-बाहेर पिटाळावें असाही विचार अनेक लोक करूं लागले. अशा लोकांत होळकराचा हाडवैरी दौलतराव शिंदे हाही होता. आश्चर्य आहे कीं नाहीं ? एके काळीं पेशव्याच्या हुकुमानें होळकराला तुरुंगांत डांबून ठेवणारा नागपूरचा रघूजी भोंसला हा सुद्धां त्याला सामील होणार होता ! असे आणखी कितीतरी होते. पण—

## १५ पण शेवटीं

दैव या गोष्टीला अनुकूल नव्हतें. मराठामंडळाची एकजूट व्हावी अशी दैवाची इच्छा नव्हती. उलट इंग्रजांचे पाय या भूमींत स्थिर व्हावेत असेंच त्या दैवाला वाटत होतें. दैवानें तरी मराठ्यांना असा दगा देण्याचें कारण ?

कारण अगदीं उघड होतें. यशवंतरावाच्या पराक्रमानें इतर मराठा सरदारांचे आणि सत्ताधीशांचे डोळे दिपून गेले होते हें खरें. पण ते कांहीं पुरते उघडले नव्हते. ते खरोखरच उघडले

असते तर जगाला कांहीं नवल घडलेलें दिसलें असतें. पण जें घडलें तें सरळ सरळ घडलें. यशवंतरावाच्या पराक्रमाची चमक फार थोडा वेळ टिकली. इंग्रजांनीं त्यांच्या डोळ्यांसमोर फेंकलेल्या चांदीची चमक अधिक प्रखर होती. तिचा परिणाम अधिक प्रभावी ठरला. यशवंतरावाशीं दोस्ती करूं पाहाणारा एक एक हात आपोआप मागें सरला आणि अखेर यशवंतराव एकाकी पडला.

तरीही त्याची उमेद ढळली नव्हती. खुद्द त्याचे उजवे डावे हात जेव्हां निखळून पडले तेव्हां मात्र तो भयंकर संतापला. त्याचा संताप त्याच्या डोक्यांत मावेनासा झाला. त्यानें त्याच्या डोक्याच्या चिंधड्या चिंधड्या केल्या. यशवंतरावाला वेड लागलें. देशप्रेमानें वेडा झालेला झुंजार यशवंतराव खरोखर वेडा झाला, वेडा झाला. आणि त्याच वेडाच्या लहरींत त्या वीराग्रणीचा पांचसहा वर्षांच्या अवधींतच दुर्दैवी अंत झाला! ( दि. २८–१०–१८११ )



❀ सेनापति तात्या टोपे

" मी इंग्रजांचा नोकर कधींच नव्हतों. त्यामुळें मी बंडखोर ठरत नाहीं. मी इंग्रजांच्या राज्यांत जन्मलों नाहीं व इंग्रजी राज्याशीं राजनिष्ठ रहाण्याची मीं कधीं शपथहि घेतली नाहीं. मी पेशव्यांचा नोकर, त्यांचेंच अन्न मी खाल्लें. त्यांच्याशीं राजनिष्ठ रहाणें माझें कर्तव्य होतें व तें मीं पूर्णपणें बजावलें. त्यांनीं आपलें गेलेलें राज्य परत मिळविण्यासाठीं खटपट चालविली आणि मीं केवळ त्यांच्या आज्ञांचें पालन केलें. मीं जें जें कांहीं केलें, तें माझ्या धन्याच्या आज्ञेवरूनच केलें. प्रथम मी नानासाहेबांच्या आज्ञेखालीं होतों आणि नंतर रावसाहेबांच्या. त्यांच्या आज्ञेनें आणि त्यांच्या वतीनें मीं तुमच्याशीं युद्ध केलें. आणि अनेक समोरासमोर लढाया दिल्या. मीं कोणाचा घातपात केला नाहीं किंवा कोणा युरोपियनांच्या बायकामुलांची हत्याहि केली नाहीं. युद्धांत माझा पराभव झाला व मीं तुमच्या हातीं लागलों, म्हणून मी दोषी ठरूं शकत नाहीं. वास्तविक तुमच्या शत्रूचा सेनापति म्हणून तुम्ही माझ्याशीं सभ्यतेचें व सन्मानाचें वर्तन ठेवणें योग्य ठरलें असतें. परंतु तुम्ही माझ्यावर बंडाचा आरोप लादलांत तो मला मुळींच मंजूर नाहीं. यापेक्षा मला अधिक कांहीं सांगायचें नाहीं. ग्वाल्हेर येथील माझ्या कुटुंबियांचा माझ्या कोणत्याहि कृतीशीं संबंध नाहीं. त्यांना कोणताहि त्रास देऊं नये. मला फांशीं द्या किंवा तोफेच्या तोंडीं द्या, पण माझी या बंधनांतून लौकर मुक्तता करा, एवढीच माझी इच्छा आहे. "

( सेनापति तात्या टोपे यांनीं त्यांच्यावरील खटल्याच्या वेळीं केलेल्या जबानीवरून — )

## १ बोरू टाकला तलवार, घेतली

१८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध ही भारताच्या इतिहासांतील एक ज्वलंत कथा आहे. या क्रांतियुद्धांत अनेक देशभक्तांनीं आपल्या सर्वस्वाची होळी केली. अनेकांनीं त्या वेळीं पेटलेल्या त्या होमकुंडांत आपल्या प्रिय प्राणांच्या आहुति दिल्या. त्या तेजस्वी बलिदानांत अग्रभागीं चमकलेल्या क्रांतिवीरांमध्यें तात्या टोपे यांचें नांव प्रामुख्यानें डोळ्यांसमोर येतें. ' सत्तावनचे झुंजार सेनानी ' असेंच त्यांचें वर्णन केलें जातें. तात्या सेनानी कसे झाले ही कथा खरोखरीच अद्‌भुत आहे !

ह्या झुंजार सेनानीचा जन्म १८१४ च्या सुमारास झाला. तात्यांचें मूळचें नांव रघुनाथ पांडुरंग भट येवलेकर असें होतें. त्यांचें मूळ घराणें नगर पातोडा जिल्ह्यांत जोल परगणा येथील होय तात्या पुण्याचेहि रहिवासी असल्याचा उल्लेख कांहीं इंग्रज लेखकांच्या पुस्तकांत आढळतो. तात्यांचें घराणें देशस्थ ब्राह्मणाचें होतें. त्यांचे वडील ब्रह्मावर्ताला दुसऱ्या बाजीरावाच्या वाड्यांत धार्मिक कृत्यें करीत असत. साहजिकच तात्यांचें बालपण ब्रह्मावर्तालाच गेलें. तेथेंच ते लहानाचे मोठे झाले. नानासाहेब पेशवे आणि झांशीची राणी लक्ष्मीबाई यांच्याबरोबर त्यांना युद्धकलेचें

शिक्षण मिळालेलें असावें. त्या दोघांपेक्षां तात्या वयानें वडील. तरीपण त्यांच्या सहवासाचा तात्यांना चांगलाच फायदा झाला, यांत शंका नाहीं.

तात्यांनीं कांहीं दिवस ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यांतहि नोकरी केली. ती कोणत्या हेतूनें केली हें इतिहासाला माहीत नाहीं. परंतु ते फार दिवस या नोकरींत राहिले नाहींत. ती नोकरी सोडल्यावर ते ब्रह्मावर्ताला आले आणि तेथें नाना-साहेबांच्या दरबारांत एक लेखनिक म्हणून काम पाहूं लागले. तात्या अतिशय बुद्धिमान् होते. लेखनिकाच्या कामांत तर ते चांगलेच तरबेज होते. त्यांच्या हुशारीचा आणि कामांतील चोख-पणाचा नानासाहेबांच्या मनावर चांगलाच प्रभाव पडून थोडक्याच दिवसांत ते त्यांच्या गळ्यांतील ताईत बनले. सत्तावनच्या उठावणीचा काळ जसजसा जवळ येत गेला, तसतशी त्या दोघांची गट्टीहि वाढूं लागली. नानासाहेब आपल्या प्रत्येक गोष्टींत तात्यांचा सल्ला घेऊं लागले. इंग्रज लेखक, ' तात्या हे नानांचे मुसाहिब, म्हणजे ए. डी. सी. होते ' असें म्हणत ते उगीच नव्हे.

तात्या ही मुळांतच मोठी रुबाबदार व्यक्ति होती. उंच, भरदार देहयष्टि, तिला शोभेसा रुंद जबडा, त्यावर भल्या मोठ्या मिशा, काळीभोर भेदक नजर, त्या डोळ्यांतल्या भावांचें वर्णन करणेंच अशक्य आहे. एवढें मात्र खरें कीं तात्यांकडे पाहतांच त्यांचें शौर्य, त्यांचें धैर्य, त्यांची देशनिष्ठा आणि उदात्त वृत्ति मनाला जाणवत असे. तात्यांचें बोलणें मोहक पण तितकेंच निश्चयी

असे. त्यांना उर्दू, मराठी, गुजराथी या तीन भाषा चांगल्या येत होत्या. इंग्रजी मात्र येत नसे. या भाषाप्रभुत्वामुळेंच ते शेंकडों सैनिकांना स्वातंत्र्ययज्ञांत भाग घेण्यासाठीं ओढूं शकले.

सत्तावनच्या स्वातंत्र्य समराची सुरवात १० मेला मीरत येथें झाली. मंगल पांडे या सैनिकानें आपल्या इंग्रज अधिकाऱ्याचा बळी घेऊन या उठावणीचा स्फोट केला आणि त्यानंतर त्याच्या ज्वाला उत्तर हिंदुस्थानभर पेटत गेल्या. नानासाहेब पेशवे ब्रह्मावर्ताला राहात होते खरे. परंतु त्यांचें सर्व लक्ष साऱ्या देशभर होणाऱ्या या उठावणीकडे लागून राहिलेलें होतें. त्यांचा राजवाडा हें त्या उठावणीचें मुख्य केंद्र होतें. येथेंच सर्व मसलती जुळत होत्या, योजना आंखल्या जात होत्या. आणि या सर्व घटनांशीं तात्यांचा अगदीं निकटचा संबंध असे. तात्यांच्या सल्ल्याशिवाय नानासाहेबांचें एक पानहि हलत नसे आणि तात्यांना माहीत नाहीं, अशी एकहि गोष्ट नानासाहेबांच्या हातून घडत नसे.

युद्धाच्या ज्वाळा भडकूं लागल्या. रोज नव्या ठिकाणीं उठावणी होऊं लागली. इंग्रज अधिकारी मारले जाऊं लागले. ठिकठिकाणीं स्वातंत्र्यध्वज फडकूं लागले. मीरत पेटलें. दिल्ली भडकली आणि कानपूरहि चेतलें. कानपूरपासून ब्रह्मावर्त अगदीं जवळ. या क्रांतियुद्धाचें उगमस्थानच तें. तेथील हालचाली वाढूं लागल्या. तूर्त मसलतींना बहर आला. रात्रींच्या रात्री जागून काढून पुढच्या योजना तयार केल्या जाऊं लागल्या. परंतु सर्व गुपचुप. कोणतीहि गोष्ट या कानाची त्या कानालासुद्धां कळत

नव्हती. सांकेतिक भाषा ठरल्या. चपात्यांतून आणि गुलाबाच्या फुलांतून संदेश जाऊं लागले आणि हें सर्व घडविण्यांत नानासाहेबांबरोबर तात्याहि होते, हें विसरतां येणार नाहीं.

शत्रूंचीं कारस्थानें हुडकून काढण्यांत इंग्रज मोठे हुशार होते म्हणतात. परंतु ब्रह्मावर्ताच्या राजवाड्यांत युद्धाचीं बीजें पेरलीं जात होतीं, याची पुसटशी कल्पनासुद्धां इंग्रजांना कधीं आली नव्हती. सैनिकांनीं प्रत्यक्ष बंडाचें निशाण रोवलें, तेव्हां इंग्रजांना समजलें कीं ही उठावणी आपल्याविरुद्ध आहे. तरीसुद्धां नानासाहेबांवर इंग्रजांचा भलताच विश्वास होता. कारण नानासाहेब आंतून कितीहि पेटलेले असले तरी वरकरणी इंग्रज अधिकाऱ्यांशीं ते अत्यंत सलगीनें वागत असत. तरीपण इंग्रज अधिकाऱ्यांत खेळीमेळीनें वागणारा नानासाहेब, संकटाच्या वेळीं इंग्रजांना आधार वाटला यांत नवल नाहीं. कानपूर येथें इंग्रज सैनिकांचें महत्त्वाचें ठाणें होतें. तेथें त्यांचा खजिना, त्यांचें दारूगोळ्याचें कोठार, तसेंच त्यांचे व्यापाराचे जिन्नसहि भरपूर प्रमाणांत होते. कानपूर येथें जनरल व्हीलर हा इंग्रज सेनापति राहात होता. मीरत येथील उठावणीची हकीगत त्याच्या कानीं येतांच त्या वृद्ध आणि अनुभवी सेनापतीनें आपल्या वसाहतीच्या भोंवतालीं खंदक खणून तोफा उभारल्या. अन्नधान्याचीहि व्यवस्था केली. परंतु इतकें करूनहि त्यास सुरक्षितता वाटत नव्हती. कारण खुद्द त्याच्याच पलटणींतील देशी सैनिक बंडाची भाषा बोलूं लागले होते. देशांत ठिकठिकाणीं असलेल्या इंग्रज फौजा मीरत, दिल्ली वगैरे भागांत

हरल्या होत्या. त्यामुळें ऐन वेळीं इंग्रज पलटणींची मदत मिळण्याची शक्यता जवळजवळ नव्हतीच. अशा परिस्थितींत व्हीलरला नानासाहेबांची आठवण झाली. आणि त्यानें त्यांच्या मदतीची याचनाहि त्यांच्यापाशीं केली. नानासाहेबांना तरी यापेक्षां वेगळें काय हवें ? इंग्रजांचें दारूचें कोठार आणि त्यांचा खजिना सहजासहजीं नानासाहेबांच्या हातांत गेला. इंग्रज सेनापति, नानासाहेबांशीं बोलणीं करावयास आले, त्या वेळीं तात्या टोपेहि तिथें होते. इंग्रजांनीं कानपूरच्या ह्या वसाहतींच्या रक्षणाची जबाबदारी नानासाहेबांवर सोपविली आणि त्यांनीं ती ताबडतोब मान्यहि केली.

ही सर्व व्यवस्था करून इंग्रज सेनापति तेथून निघून गेले. नंतरच्या दोन-चार दिवसांतच एक विलक्षण घटना घडली. तात्यांनीं आपल्या कानावरचा बोरू फेंकून दिला. हातांत तलवार घेतली आणि डोक्यावर सेनापतीची टोपी चढविली. यावेळेपासूनच 'तात्या भट' या लेखनिकाचे 'तात्या टोपे' हे सेनापति झाले ! आणि त्यांनीं नानासाहेबांच्या म्हणजे पेशव्यांच्या फौजेचें नेतृत्व स्वीकारलें. पूर्वीं ठरल्याप्रमाणें तात्यांच्या या फौजेनें इंग्रजांचा खजिना आणि दारूगोळा स्वतःच्या उपयोगासाठीं ताब्यांत घेतला हें सांगणें नकोच. कानपूर येथें इंग्रजांशीं झालेल्या चकमकींत दोनशेंच्यावर इंग्रज मारले गेले. बाकीचे नानासाहेबांना शरण आले. परंतु पुढें त्यांचीहि कत्तल झाली. एक जुलैला नानासाहेबांना कानपूर येथें राज्याभिषेक करण्यांत आला. सुमारें १५ दिवस नानासाहेबांनीं मोठ्या इतमामानें राज्य केलें. त्यानंतर मात्र

जनरल् हॅवलॉक् कानपूरच्या रक्षणासाठीं धांवून आला. त्याच्याशीं झालेल्या लढाईत नानासाहेबांचा पराभव झाला आणि त्यांना कानपूर सोडून काल्पी येथें जावें लागलें. येथून पुढें तात्यांनींच लढाईचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतलीं आणि अत्यंत चिकाटीनें आणि प्राणपणानें लढून यापुढील पावणेदोन वर्षांत इंग्रज सेनापतींना सळो कीं पळो करून सोडलें.

## २ पुन्हां कानपूर जिंकलें — आणि घालविलें —

तात्यांनीं इंग्रजांशीं अनेक लढाया केल्या. त्यांत त्यांना कधीं यश मिळालें तर कधीं अपयश. इंग्रजांशीं सतत लढत राहाणें हाच त्यांचा एकमेव बाणा होता. ते सतत लढत राहिले आणि रणवीर म्हणूनच शेवटीं फांशीं गेले.

नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यांत कानपूर येथें जनरल् विंडहॅम हा इंग्रज सेनापति नेमण्यांत आला होता. त्यानें युरोपांत उत्तम सेनानी म्हणून नांव मिळविलें होतें. अशा ह्या कसलेल्या सेनापतीला कोंडींत पकडण्याचा डाव तात्यांनीं आंखला. त्यांनीं काल्पीच्या किल्ल्यांत आपल्या सैन्याचा मुख्य तळ ठेवला. तेथून गंगायमुनांच्या दुआबामधील बरींच गांवें त्यांनीं काबीज केलीं. विंडहॅम तयारींतच होता. त्यानें पांडू नदीवर झालेल्या लढाईंत तात्यांच्या सैन्याचा पराभव केला. तात्यांनीं थोडीशी माघार

घेतली. हा त्यांच्या गनिमी काव्याचाच एक भाग होता. त्यांनीं इंग्रज सैन्याला हुलकावणी देत देत लांब अडचणीच्या जागीं नेलें आणि मग एकदम त्यावर आपल्या तोफांचा मारा सुरू केला. इतक्यांत लखनौहून इंग्रज सैन्याची एक तुकडी विंडहॅमच्या मदतीला आली तरीहि डगमगून न जातां तात्यांनीं निकरानें युद्ध चालू ठेवलें. आणि शेवटीं त्यांनीं विंडहॅमचा पूर्ण पराभव केला. या लढाईत इंग्रजांचे विल्सन, मर्फी, गिब्न्स इत्यादि अधिकारी ठार झाले. आणि तात्यांनीं कानपूर जिंकलें !

इतक्यांत लखनौहून कॉलिन या नांवाचा एक इंग्रज सेनापति कानपूरच्या इंग्रजांच्या मदतीला येण्यासाठीं निघाला. तो कानपूरला पोंचूं नये म्हणून तात्यांनीं त्याच्या मार्गावरील, गंगानदीवरील एक पूल उध्वस्त करून टाकला. परंतु तात्यांचा हा डाव यशस्वी झाला नाहीं. कॉलिन्चें सैन्य दुसऱ्याच मार्गानें गंगापार होऊन कानपूरला पोंचलें. तेव्हां तात्यांनीं कानपूर येथें कॉलिन्शीं निकराची लढाई दिली. या लढाईत प्रत्यक्ष कॉलिन्च्या तळावर हल्ला करण्यासहि तात्यांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं. तात्यांना या लढाईतहि विजय मिळाला असता. परंतु शीख सैनिकांच्या फितुरीमुळें त्यांना शेवटीं माघार घेणेंच भाग पडलें. कॉलिन्नें त्यांचा खूप पाठलाग केला. परंतु तात्यांनीं गनिमी काव्यानें लढून पाठलागावर येणाऱ्या त्या इंग्रज सैन्याची धूळधाण उडविली.

तात्यांच्या लढाया म्हणजे पळापळीचा खेळ असें वरवर पाहणाराला वाटतें. परंतु मोजकें सैन्य आणि अपुरी युद्धसामुग्री

यांच्या आधारानें इंग्रजांसारख्या सर्व दृष्टींनीं प्रबळ असलेल्या शत्रूशीं टक्कर देणें ही गोष्ट दिसते तितकी सोपी नव्हती. तात्यांची जिद्द विलक्षण होती. दुसऱ्या एखाद्या सामान्य सेनापतीला चार दिवससुद्धां तग धरणें शक्य झालें नसतें. तात्यांसारखा धडाडीचा सेनापतीच पावणेदोन वर्षेंपर्यंत इंग्रजांशीं सतत लढूं शकला आणि तोंहि इंग्रज सैन्याला हैराण करून. तात्यांना फार मोठे विजय मिळवतां आले नाहींत ही गोष्ट खरी. पण हा दोष तात्यांचा नसून त्या वेळच्या एकूण परिस्थितीचा आहे, असें दिसून येईल.

### ३ भरारी गरुडाची, पण—

तात्यांचें युद्धाचें तंत्रच विलक्षण होतें. ते संधि मिळेल त्याप्रमाण कृति करीत होते. आगगाड्यांचीं स्टेशनें जाळीत होते, खजिने लुटीत होते, दारूगोळा पळवीत होते. त्यांनीं लढाया केल्या — लढाया गमावल्या. सैन्यें जमा केलीं आणि सैन्यें घालविलीं. असें जरी असलें तरी त्यांच्या साऱ्या हालचाली विजेच्या वेगानें होत होत्या. चाळीस-चाळीस मैलांच्या वेगानें ते दिवसच्या दिवस दौड मारीत असत. डोंगर-पहाडांनीं त्यांची दौड थांबली नाहीं. गंगा-यमुनांसारख्या मोठमोठ्या नद्या त्यांना अडवूं शकल्या नाहींत. ऊन, पाऊस, थंडी यांनीं त्यांचा मार्ग रोधला नाहीं. ते एकसारखे दौडतच राहिले. अगदीं प्रतिकूल परिस्थितींतहि इंग्रजांशीं लढत राहिले.

इंग्रजांनीं त्यांना जाळ्यांत अडकवण्याचे केलेले सर्व प्रयत्न फसत होते आणि तात्या निसटून जात होते.

डिसेंबरमध्यें कानपूर तात्यांच्या हातून गेलें तें कायमचेंच. कानपूर ताब्यांत येतांच इंग्रजांनीं तेथेंच आपलें मुख्य केंद्र केलें आणि आपली गेलेली सत्ता पुन्हां मिळविण्याच्या उद्योगास ते लागले. इतक्यांत झांशीच्या राणी लक्ष्मीबाईकडून तात्यांना मदतीसाठीं बोलावणें आलें. आठ दिवसपर्यंत राणीनें इंग्रजांशीं निकराचा सामना दिला होता. परंतु इंग्रजांपुढें आपला निभाव लागत नाहीं हें पाहून तिनें तात्यांची मदत मागितली. तात्या वीस हजार फौज घेऊन झांशीला गेले. परंतु इंग्रज सेनापति सर ह्यू रोज यानें त्यांच्या सैन्याचा साफ धुव्वा उडविला. त्यांच्या तोफा आणि इतर युद्ध साहित्यसुद्धां इंग्रजांच्या हातीं आलें. या लढाईत तात्यांचें खूपच नुकसान झालें.

### ४ मरेपर्यंत झुंज

यानंतर तात्या गोपालपूरला गेले आणि त्यांनीं क्रांतियुद्धाच्या सर्व पुढाऱ्यांची भेट घेतली. तेथें झालेल्या चर्चेत ग्वाल्हेरच्या शिंद्यांना सामील करून घेण्याचें ठरलें. तें काम तात्यांवर सोंपविण्यांत आलें. तात्यांनीं ग्वाल्हेरला जाऊन शिंद्यांची भेट घेतली आणि त्यांना आपणांस येऊन मिळण्याची विनंति केली. परंतु शिंदे त्यांना सामील तर झाले नाहींतच, उलट त्यांनीं त्यांच्या विरोधीच भूमिका घेतली. शेवटीं निरुपाय होऊन तात्यांनीं

शिंद्यांशीं लढाई करण्याचाच विचार केला. शिंद्यांपाशीं सुसज्ज असा तोफखाना होता. आणि कवायती फौजहि होती. तरीपण तात्यांच्या सैन्यापुढें शिंद्यांचा निभाव लागला नाहीं. शिंदे ग्वाल्हेर सोडून आग्र्याला पळून गेले. आणि ग्वाल्हेरचा आणि शिंद्यांच्या सैन्याचा ताबा तात्यांनीं घेतला.

हा विजय अतिशय महत्त्वाचा होता. कारण त्यामुळें क्रांतिकारकांचें बळ वाढलें आणि उत्साहहि वाढला. या विजयानंतर तात्यांनीं ग्वाल्हेर येथें दरबार भरवून स्वतंत्र राज्याचीहि घोषणा केली. परंतु या विजयाचा आनंद त्यांना फार काळ लाभूं शकला नाहीं. इंग्रज सेनापति सर ह्यू रोज हा त्यांच्या मागावर होता, तो ग्वाल्हेरवर त्वरेनें चाल करून आला. राणी लक्ष्मीबाई, आणि तात्या टोपे या दोघांनीं त्याला निकराचा विरोध केला. परंतु शेवटीं दोघांचाहि पराभव झाला. राणीला या लढाईत आपले प्राण गमवावे लागले आणि तात्यांना जंगलाचा आश्रय करावा लागला. तात्या पळाले खरे, पण पळतां पळतां सुद्धां त्यांनीं इंग्रजांना सळो कां पळो करून सोडलें. इंग्रज तर आतां अजिंक्यच झाले होते. परंतु तरीहि तात्यांच्या गनिमी काव्याला तोंड देणें त्यांना फार कठीण जात होतें.

तात्या ग्वाल्हेरमधून बाहेर पडले ते मध्य हिंदुस्थानांत घुसले. या प्रदेशांत त्यांनीं खूपच धुमाकूळ घातला. लुटालूट आणि जाळपोळ करून त्यांनीं भरपूर पैसा गोळा केला आणि नवीन मोठें सैन्य उभारलें. पुन्हां कांहीं दिवस मध्य हिंदुस्थानांत सर्वत्र तात्यांचें नांव घुमूं लागलें.

इंग्रज शिकाऱ्यांचे भाले तात्यांच्या पाठीशीं सारखे लागले होते. हा मराठा वाघ मध्यहिंदुस्थानच्या जंगलांत घुसला होता. इंग्रज शिकाऱ्यांना तो झुकांड्या देत राहिला होता. तात्या आतां एकाकी पडले होते. राणी लक्ष्मीबाई कामास आल्यामुळें तात्यांचा उजवा हातच गळून पडल्यासारखा झाला होता.

इंग्रजी सत्ता पुन्हां सर्व देशभर स्थिर झाली होती. त्यांचें बळ खूपच वाढलें होतें. इंग्रज आतां जवळजवळ अजिंक्यच झाले होते. तात्यांजवळ तोफा नव्हत्या किंवा नांव घेण्यासारखें सैन्यहि नव्हतें. नवीन सैन्याची कुमक कुठूनहि मिळण्यासारखी नव्हती. परंतु तात्यांचा धीर पराभवालाहि लज्जित करणारा होता. त्यांचा जरीपटका शत्रूच्या पायावर वांकला नाहीं. मरेपर्यंत झुंजत राह्यचें हाच एक त्यांचा बाणा होता.

ग्वाल्हेरला पाडाव झाल्यानंतर तात्यांनीं आपल्या युद्धपद्धतीची रूपरेषा पुन्हां एकदां ठरविली. इंग्रज सैन्याशीं समोरासमोर झुंज देण्याला उभेंच राहावयाचें नाहीं असें त्यांनीं ठरविलें. त्यांच्याशीं गनिमी काव्यानेंच लढणें त्यांनीं चालू ठेवलें. मात्र युद्ध चालू ठेवण्यासाठीं लागणारें साहित्य, पैसा आणि सैन्य त्यांनीं हिंदी संस्थानिकांकडून सक्तीनें मिळविण्याचें ठरविलें. मध्य हिंदुस्थानांत पावलोगणिक संस्थानें होतीं. त्यांच्यापाशीं दारूगोळा आणि धान्य भरपूर सांठविलेलें होतें. त्यांच्या मतें हें सर्व साहित्य देशाच्या रक्षणासाठीं देणें हे त्यांचें कर्तव्यच होतें. परंतु हें संस्थानिक इंग्रजांचे

लाळघोटे बनले असल्यामुळें क्रांतीच्या कार्याला ते मदत करणें अगदीं अशक्य होतें. म्हणूनच तात्यांना त्यांच्यावर सक्ती करण्याचा मार्ग अवलंबावा लागला.

तात्यांचा यापुढील बेत नर्मदा नदी ओलांडून दक्षिणेंत जाण्याचा होता. आपला महाराष्ट्र आपल्या पाठीशीं नक्कीच उभा राहील अशी त्यांना सबळ आशा होती. याउलट इंग्रजांचें धोरण तात्यांना नर्मदेच्या पलीकडे तर जाऊं द्यायचें नाहींच, पण नर्मदेपर्यंतसुद्धां त्यांना येऊं द्यायचें नाहीं असें होतें. अशी दोघांची विलक्षण स्पर्धा लागली होती.

तात्या भरतपूरला येऊन पोहोंचले. परंतु इंग्रज सैन्य त्या-अगोदरच तेथें आलें होतें. म्हणून ते जयपूरकडे गेले. तेथेंहि त्यांचा पाठलाग झाला. इंग्रज सेनापति होम्स यानें त्यांना गांठलेच. परंतु तात्यांनीं मोठ्या कौशल्यानें त्याच्या हातावर तुरी दिल्या आणि ते टोंक संस्थानाकडे गेले. तेथील सैनिकांनीं तात्यांचें स्वागत केलें. आणि ते तात्यांना सामील झाले. याठिकाणीं तात्यांच्या हातीं चार तोफा, नवीन सेना आणि नवीन युद्धसामुग्रीहि आली. या नवीन मदतीच्या जोरावर तात्या पाठलाग करणाऱ्या इंग्रज सैन्याला हुलकावण्या देत देत चंबळा नदीपर्यंत आले. परंतु आतां इंग्रज सैन्य चहूंबाजूंनीं तात्यांच्या मागें लागलें होतें. तात्या चंबळा नदी उतरून पलीकडे जाणार तोंच समोर इंग्रज पलटण उभी असलेली त्यांना दिसली. मागें इंग्रज, पुढें इंग्रज, बाजूंनाहि इंग्रज सैन्यानें अटकाव केलेला. अशाहि परिस्थितींत न डगमगतां तात्यांनीं

कधीं लढण्याचा आव आणून तर कधीं शत्रूचा डोळा चुकवून इंग्रजांच्या हातावर तुरी दिल्या आणि ते चंबळा नदीच्या पार झाले. तिथून तात्या निसटले ते थेट इंदूरलाच गेले. इंदूरचें सैन्य तात्यांना आधींच वश झालेलें होतें. इंदूरची राजसभाहि त्यांना आंतून सामील होती. त्यामुळें इंदूरला आल्यावर तात्यांना बरीच कुमक मिळूं शकली.

आतां मात्र इंग्रज सेनापति टेकीस आले. तात्यांचा पाठलाग चालविणें त्यांच्या आतां जिवावर आलें. इंग्रज सैन्य विश्रांतीसाठीं थांबलेलें पाहून तात्यांचा उत्साह अधिकच वाढला. तात्यांना विश्रांतीची गरजच नव्हती. कारण त्यांनीं चालविलेलें युद्ध स्वातंत्र्यासाठीं होतें. आणि तें पदरांत पडेपर्यंत विश्रांति घेणें हें त्यांना पाप वाटत होतें.

इंग्रज सेनापतींनीं पुन्हां एकदां जोरदार उठावणी केली. दक्षिणेकडून मिचेल, पूर्वेकडून लिडेल, उत्तरेकडून सेनापति मीड, पश्चिमेकडून कर्नल पार्क आणि चंबळानदीच्या बाजूनें रॉबर्ट्स् अशा सेनापतींच्या फौजा तात्यांच्या भोंवतालचे पाश आंवळीत चालल्या. शत्रूची फळी फोडून दक्षिणेकडे जाणें ही गोष्ट तात्यांना आतां अतिशय अशक्य होती. तरीपण त्यांनीं इतक्या विलक्षण धाडसी हालचाली केल्या कीं, त्या पाहून इंग्रज सेनापति आश्चर्यानें थक्क झाले. एवढा जबरस्त पाठलाग चालू असतांनाहि त्यांना हुशंगाबादेजवळ नर्मदा ओलांडली आणि ते नागपूरला आले. तात्यांची ही भरारी जितकी बेडरपणाची तितकीच अद्भुत होती. साऱ्या

हिंदुस्थानानेंच नव्हे, तर साऱ्या जगानेंहि तात्यांच्या या धाडसाचें मुक्तकंठानें कौतुक केलें आहे. मॅलिसन हा इंग्रज लेखक एका ठिकाणीं लिहितो, "तात्यानें ज्या निश्चयानें आणि चिकाटीनें माघारीची ही विलक्षण योजना पार पाडली, त्याचें कौतुक करूं न म्हटलें, तरी शक्य आहे."

## ५ तात्या अमर झाले

तात्या आतां आपल्या महाराष्ट्रांत आले होते. महाराष्ट्राबद्दल त्यांना फार आशा होती, त्यांच्या डोळ्यासमोर आतां तो रायगड उभा राहिला. बाजीप्रभूची ती पावनखिंड त्यांना दिसूं लागली. वडगांवच्या लढाईचेंहि चित्र त्यांच्या डोळ्यांसमोर तरळूं लागलें. तात्यांची आशा पालवली होती. पुढील योजनांचे बेत त्यांच्या मनांत घोळूं लागले होते. पण महाराष्ट्रानें त्यांची निराशा केली. नागपूरच्या बंकाराणीनें इंग्रजांशींच निष्ठ राहण्याचें ठरविलें तरीहि धीर न सोडतां तात्या बडोद्याकडे निघाले. आतां त्यांची प्रत्येक हालचाल रोधली जात होती. जागोजागीं त्यांना शत्रूचें सैन्य अडवीत होतें. त्याच्याशीं सामना देत, मजलीवर मजली मारीत तात्यांची धांवपळ चालली होती. पाठलाग चालू होता. इंग्रज सेनापति तात्यांना पकडण्यासाठीं जंगजंग पछाडीत होते. तात्या जिथें जिथें गेले तिथें तिथें निराशाच त्यांच्या पदरीं आली. त्यांचेंहि बळ आतां खचूं लागलें होतें. तरीसुद्धां शरणागति न पत्करायाचा त्यांचा निश्चय कायम

होता. तात्या इंद्रगडला येऊन पोहोंचले. रावसाहेब पेशवेसुद्धां लव-करच तेथें येऊन पोहोंचले. मानसिंग नांवाचा क्रांतिकारकहि त्या वेळीं त्यांच्यावरोबर होता. ते पुढील योजनेच्या वाटाघाटी करीत होते. इतक्यांत इंग्रजांनीं अचानक त्यांच्या छावणीवर हल्ला केला. परंतु इंग्रजांनीं घातलेल्या धुमाकुळाचा फायदा घेऊन तात्या येथूनहि निसटले आणि इंग्रज सेनापतींच्या माना लाजेनें खालीं आल्या.

तात्या खरोखरच इंग्रजांच्या हातीं आले नसते. सैन्यबळावर तात्यांना पकडणें इंग्रजांना आतां अगदीं अशक्य वाटूं लागलें. शेवटीं त्यांनीं फितुरीचा मार्ग अवलंबिला आणि त्यांच्या गळाला मासा लागला, तो म्हणजे मानसिंग. या दुष्ट मानसिंगानें तात्यांचा विश्वासघात केला आणि ७ एप्रिल १८५९ या दिवशीं मध्यरात्रीं तात्या झोंपलेले असतांना त्यानें त्यांना इंग्रजांच्या स्वाधीन केलें. तात्या कैद झाले. त्यांच्यावर लष्करी अभियोग करण्यांत आला आणि शेवटीं त्यांना फांसावर चढविण्यांत आलें (१८ एप्रिल, १८५९). तात्यांनीं आपल्या बचावासाठीं म्हणून केलेल्या भाषणाचा सारांश प्रारंभीं दिला आहेच. असा हा निधड्या छातीचा भारताचा अखेरचा सेनापति इंग्रजांच्या भेदनीतीला आणि देशद्रोह्यांच्या विश्वासघाताला बळी पडला. पण त्याचें सेनापतित्व मात्र अमर राहिलें.

ग्रंथालय. ठाणे. स्थलांतर
९४८३०
........ दि: ........

REFBK-0014437